कर्नाटक सरकार

# माय-मराठी

## मराठी प्रथम भाषा पाठ्यपुस्तक

## Marathi First Language

### Part - 1

# 8

## इयत्ता आठवी

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**Karnataka Textbook Society (R)**
**6th Cross, Malleshwaram,**
**Bengaluru - 560 003.**

# Preface

The Textbook Society, Karnataka has been engaged in producing new textbooks according to the new syllabi prepared which in turn are designed based on NCF - 2005 since June 2010. Textbooks are prepared in 11 languages; seven of them serve as the media of instruction. From standard 1 to 4 there is the EVS and 5th to 10th there are three core subjects namely mathematics, science and social science.

**NCF - 2005 has a number of special features and they are:**

- Connecting knowledge to life activities.
- Learning to shift from rote methods.
- Enriching the curriculum beyond textbooks.
- Learning experiences for the construction of knowledge.
- Making examinations flexible and integrating them with classroom experiences. Caring concerns within the democratic policy of the country.
- Make education relevant to the present and future needs.
- Softening the subject boundaries integrated knowledge and the joy of learning.
- The child is the constructor of knowledge.

The new books are produced based on three fundamental approaches namely.

Constructive approach, Spiral Approach and Integrated approach.

The learner is encouraged to think, engage in activities, masters skills and competencies. The materials presented in these books are integrated with values. The new books are not examination oriented in their nature. On the other hand they help the learner in the total development of his/her personality, thus help him/her become a healthy member of a healthy society and a productive citizen of this great country India.

Mathematics is essential in the study of various subjects and in real life. NCF 2005 proposes moving away from complete calculations, construction of a framework of concepts, relate mathematics to real life experiences and cooperative learning.

Many students have a maths phobia and in order to help them overcome this phobia, jokes, puzzles, riddles, stories and games have been included in textbooks. Each concept is introduced through an activity or an interesting story at the primary level. The contributions of great Indian mathematicians are mentioned at appropriate places.

The Textbook Society expresses grateful thanks to the chairpersons, writers, scrutinisers, artists, staff of DIETs and CTEs and the members of the Editorial Board and printers in helping the Text Book Society in producing these textbooks.

**Nagendra Kumar**
Managing Director
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

**Prof G S Mudambadithaya**
Coordinator
Curriculum Revision and Textbook Preparation
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

# TEXT BOOK COMMITTEE

**CHAIRMAN :**

1) **Sri P.K. Muchandikar,** A.M., Govt. Marathi Higher Primary School Konewadi, Belagavi.

**MEMBERS :**

1) **Sri S.D. Pakhare,** A.M., Govt. Marathi Higher Pry. School Kadoli, Belagavi.

2) **Sri J.S. Mali,** H.M., Govt. Marathi Higher Pry. School, Kurli Chikodi Dist., Belagavi.

3) **Sri A.S. Buvaji,** A.M., Govt. Marathi Lower Pry. School, Jainkop, Khanapur Dist. Belagavi.

4) **Sri I.S. Patil**, A.M., Govt. Marathi Higher Pry. School Tarihal, Belagavi.

5) **Smt. Sangeeta Deshpande,** A.M., V.M. Shanbhag Marathi School Bhagyanagar, Tilakwadi, Belagavi.

**ARTIST :**

6) **Sri Tharakesh**, Govt. High School, Bannitalpur, Gundlupete, Dist-Chamarajanagar.

**SCRUTINIZER :**

7) **Sri Madhav Kunte**, A.M., Smt. Ushatai, Gogate Girls High School, Belagavi.

**CHIEF CO-ORDINATOR :**

**Prof. G.S. Mudambadithaya**, Co-ordinator, Curriculum Revision and Text Preparation, KTBS® Bengaluru.

**CHIEF ADVISERS :**

**Sri Narasimhaiah**, Managing Director, Karnataka Textbook Society® Bengaluru.

**Sri C. Nagamani**, Deputy Director, Karnataka Textbook Society® Bengaluru.

**PROGRAMME CO-ORDINATOR:**

**Smt. M. Bhagyavathamma**, Assistant Director, Karnataka Textbook Society® Bengaluru.

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# पुस्तक उघडण्यापूर्वी

**विद्यार्थी / शिक्षक मित्रांनो!**

आठवी मराठी प्रथम भाषा पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. एन.सी.ई.आर.टी. च्या 2005 च्या नव्या अभ्यासक्रमानुसार कर्नाटक पाठ्यपुस्तक संघाने कर्नाटकासाठीचा अभ्यासक्रम बनविला, त्या अभ्यासक्रमानुसार हे पाठ्यपुस्तक बनविण्यात आले आहे.

कर्नाटकातील समृद्ध परिसर, परंपरा, इतिहास यांचा विचार करूनच हे पुस्तक बनविले आहे. अंधश्रद्धा, जातीभेद, भाषाभेद इत्यादी गोष्टी वगळण्यात आल्या आहेत. प्राचीन साहित्यापासून आधुनिक साहित्यापर्यंत सर्व प्रकारचे साहित्य देण्याचा प्रयत्न केला आहे.

या पाठ्यपुस्तकाचे वेगळेपण म्हणजे यातील पाठ व कवितांचा क्रम सोप्यापासून कठिणतेकडे असा ठेवण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना हा क्रम आवडेल असा विश्वास वाटतो. पाठ्यपुस्तक सर्वांगपरिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु ते सर्वांगपरिपूर्ण आहे असा दावा आम्ही करीत नाही. काही त्रुटी आढळल्यास कृपया निदर्शनास आणाव्यात. पुढील आवृत्तीत त्यांचा सुधारणेसाठी विचार केला जाईल.

हे पाठ्यपुस्तक तुम्हास आवडले तर आम्हाला आनंद वाटेल.

**- पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ**

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# ಪರಿಷ್ಕರಣೆ ಕುರಿತು

ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಬಗ್ಗೆ ಪ್ರಕಟಗೊಂಡ ಸಾರ್ವಜನಿಕ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಗಮನಿಸಿ ಮಾನ್ಯ ಮುಖ್ಯಮಂತ್ರಿಯವರೂ ಅರ್ಥಸಚಿವರೂ ಆಗಿರುವ ಶ್ರೀ ಸಿದ್ದರಾಮಯ್ಯನವರು ತಮ್ಮ 2014–15 ರ ಬಜೆಟ್‌ನಲ್ಲಿ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ರಚಿಸುವ ಘೋಷಣೆ ಮಾಡಿದರು. ತಜ್ಞರು ಅನುಸರಿಸಬೇಕಾದ ಮೂಲ ಆಶಯವನ್ನು ಹೀಗೆ ಹೇಳಿದರು: "ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯ, ನೈತಿಕಮೌಲ್ಯಗಳು, ವ್ಯಕ್ತಿತ್ವವಿಕಸನ, ವೈಜ್ಞಾನಿಕ ಮತ್ತು ವೈಚಾರಿಕ ಮನೋಭಾವ, ಜಾತ್ಯತೀತತೆ ಮತ್ತು ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಬದ್ಧತೆಗಳಿಗೆ ಅನುವಾಗುವಂತೆ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ಪುನರ್ ರಚಿಸಲಾಗುವುದು" – ಇದು ಬಜೆಟ್ ಭಾಷಣದಲ್ಲಿ ಸಾದರಪಡಿಸಿದ ಆಶಯ.

ಆನಂತರ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆಯು ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಪರಿಷ್ಕರಣೆಗಾಗಿ 27 ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ದಿನಾಂಕ: 24.11.2014 ರಂದು ಆದೇಶಹೊರಡಿಸಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ವಿಷಯವಾರು ಮತ್ತು ತರಗತಿವಾರು ಮಾನದಂಡಕ್ಕನುಗುಣವಾಗಿ ರಚಿತವಾದವು. ವಿವಿಧ ಪಠ್ಯವಿಷಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರು, ಅಧ್ಯಾಪಕರು ಈ ಸಮಿತಿಗಳಲ್ಲಿದ್ದಾರೆ. ಈಗಾಗಲೇ ಲಿಖಿತವಾಗಿ ಬಂದಿರುವ ಅನೇಕ ಆಕ್ಷೇಪಗಳು ಮತ್ತು ವಿಶ್ಲೇಷಣೆಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಿ, ತಪ್ಪು ಒಪ್ಪುಗಳ ಬಗ್ಗೆ ನಿರ್ಣಯಿಸಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ ಹೊಣೆಹೊತ್ತ ಈ ಸಮಿತಿಗಳಿಗೆ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪಠ್ಯವಸ್ತುವನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸಿ ನಂತರ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು 24.11.2014ರ ಆದೇಶದಲ್ಲೇ ನೀಡಲಾಗಿತ್ತು. ಆನಂತರ 19.09.2015 ರಂದು ಹೊಸ ಆದೇಶ ಹೊರಡಿಸಿ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪುನರ್ ರಚಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು ನೀಡಲಾಯಿತು. ಹೀಗೆ ಸಮಗ್ರ ಪರಿಷ್ಕರಣೆಗೊಂಡ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು 2016–17 ರ ಬದಲು 2017–18ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಜಾರಿಗೊಳಿಸಲಾಗುವುದೆಂದು ಇದೇ ಆದೇಶದಲ್ಲಿ ತಿಳಿಸಲಾಯಿತು.

ಅನೇಕ ವ್ಯಕ್ತಿಗಳೂ ಸಂಘಟನೆಗಳೂ ಸ್ವಯಂಪ್ರೇರಿತರಾಗಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಮಾಹಿತಿದೋಷ, ಆಶಯದೋಷಗಳನ್ನು ಪಟ್ಟಿಮಾಡಿ ಶಿಕ್ಷಣ ಸಚಿವರಿಗೆ, ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘಕ್ಕೆ ಕಳುಹಿಸಿದ್ದರು. ಅವುಗಳ ಪರಿಶೀಲನೆಮಾಡಿದ್ದಲ್ಲದೆ, ಸಮಿತಿಗಳಾಚೆಗೆ ಅನೇಕ ಸಂವಾದಗಳನ್ನು ಏರ್ಪಡಿಸಿ ವಿಚಾರ ವಿನಿಮಯ ಮಾಡಿಕೊಂಡಿದ್ದೇವೆ. ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಾಲಾ ಅಧ್ಯಾಪಕರ ಸಂಘಗಳ ಜೊತೆ ಚರ್ಚಿಸಿದ್ದಲ್ಲದೆ ಪ್ರಶ್ನಾವಳಿ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿ ಅಧ್ಯಾಪಕರಿಗೆ ಕಳಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಸಂಗ್ರಹಿಸಲಾಗಿದೆ. ಅಧ್ಯಾಪಕರು, ವಿಷಯಪರಿವೀಕ್ಷಕರು ಮತ್ತು ಡಯಟ್ ಪ್ರಾಂಶುಪಾಲರ ಪ್ರತ್ಯೇಕ ಸಭೆಗಳನ್ನು ನಡೆಸಿ ವಿಶ್ಲೇಷಣಾತ್ಮಕ ಅಭಿಮತಗಳನ್ನು ಪಡೆಯಲಾಗಿದೆ. ವಿಜ್ಞಾನ, ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ, ಭಾಷೆ ಸಾಹಿತ್ಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರಿಗೆ ಮೊದಲೇ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕಳುಹಿಸಿ ಆನಂತರ ಸಭೆ ನಡೆಸಿ ಚರ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಮಹಿಳಾ ಸಂಘಟನೆ ಹಾಗೂ ವಿಜ್ಞಾನ ಸಂಬಂಧಿ ಸಂಸ್ಥೆಗಳನ್ನು ಆಹ್ವಾನಿಸಿ ಚಿಂತನೆ ನಡೆಸಲಾಗಿದೆ. ಹೀಗೆ ಎಲ್ಲಾ ಮೂಲಗಳಿಂದ ಪಡೆದ ಅರಿವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಅಗತ್ಯವಿದ್ದಕಡೆ ಪರಿಷ್ಕರಿಸಲಾಗಿದೆ.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

ಬಹುಮುಖ್ಯವಾದ ಇನ್ನೊಂದು ಸಂಗತಿಯನ್ನು ಇಲ್ಲಿ ಹೇಳಬೇಕು. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ (N.C.E.R.T) ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ತೌಲನಿಕವಾಗಿ ಅಧ್ಯಯನ ಮಾಡಿ ಸಲಹೆಗಳನ್ನು ನೀಡಲು ವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ ಮತ್ತು ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಸಂಬಂಧಿಸಿದಂತೆ ತಜ್ಞರ ಮೂರು ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಲಾಯಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ನೀಡಿದ ತೌಲನಿಕ ವಿಶ್ಲೇಷಣೆ ಮತ್ತು ಸಲಹೆಗಳನ್ನು ಆಧರಿಸಿ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟವನ್ನು ಹೆಚ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳಿಗಿಂತ ನಮ್ಮ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟ ಕಡಿಮೆಯಾಗದಂತೆ ಕಾಯ್ದುಕೊಳ್ಳಲಾಗಿದೆ. ಜೊತೆಗೆ ಆಂಧ್ರ, ತಮಿಳುನಾಡು, ಮಹಾರಾಷ್ಟ್ರಗಳ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ನಮ್ಮ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಲಾಗಿದೆ.

ಇನ್ನೊಂದು ಸ್ಪಷ್ಟನೆಯನ್ನು ನೀಡಲು ಬಯಸುತ್ತೇನೆ. ನಮ್ಮ ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿರುವುದು ಪರಿಷ್ಕರಣೆಯೇ ಹೊರತು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸಮಗ್ರ ರಚನೆಯಲ್ಲ. ಆದ್ದರಿಂದ ಈಗಾಗಲೇ ರಚಿತವಾಗಿರುವ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸ್ವರೂಪಕ್ಕೆ ಎಲ್ಲಿಯೂ ಧಕ್ಕೆಯುಂಟುಮಾಡಿಲ್ಲ. ಲಿಂಗತ್ವ ಸಮಾನತೆ, ಪ್ರಾದೇಶಿಕ ಪ್ರಾತಿನಿಧ್ಯ, ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಸಮಗ್ರತೆ, ಸಮಾನತೆ, ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯಗಳ ಹಿನ್ನೆಲೆಯಲ್ಲಿ ಕೆಲವು ಪರಿಷ್ಕರಣೆಗಳು ನಡೆದಿವೆ. ಹೀಗೆ ಪರಿಷ್ಕರಿಸುವಾಗ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟು ಮತ್ತು ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟುಗಳನ್ನು ಮೀರಿಲ್ಲವೆಂದು ತಿಳಿಸಬಯಸುತ್ತೇನೆ: ಜೊತೆಗೆ ನಮ್ಮ ಸಂವಿಧಾನದ ಆಶಯಗಳನ್ನು ಅನುಸರಿಸಲಾಗಿದೆ. ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿದ ಪರಿಷ್ಕರಣೆಯನ್ನು ಮತ್ತೊಮ್ಮೆ ಪರಿಶೀಲಿಸಲು ವಿಷಯವಾರು ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಪಡೆದು ಅಳವಡಿಸಲಾಗಿದೆ.

ಹೀಗೆ ಕ್ರಮಬದ್ಧವಾಗಿ ನಡೆದ ಕೆಲಸಕ್ಕೆ ತಮ್ಮನ್ನು ತಾವು ಸಂಪೂರ್ಣ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ 27 ಸಮಿತಿಗಳ ಅಧ್ಯಕ್ಷರು ಮತ್ತು ಸದಸ್ಯರನ್ನು ಹಾಗೂ ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನಾ ಸಮಿತಿಯ ಸಮಸ್ತರನ್ನು ಕೃತಜ್ಞತೆಯಿಂದ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಅಂತೆಯೇ ಸಮಿತಿಗಳ ಕೆಲಸ ಸುಗಮವಾಗಿ ನಡೆಯುವಂತೆ ವ್ಯವಸ್ಥೆಮಾಡಲು ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಅಧಿಕಾರಿಗಳಾಗಿ ನಿಷ್ಠೆಯಿಂದ ದುಡಿದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘದ ಎಲ್ಲಾ ಅಧಿಕಾರಿಗಳನ್ನೂ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಸಹಕ-ರಿಸಿದ ಸಿಬ್ಬಂದಿಗೂ ನಮ್ಮ ವಂದನೆಗಳು. ಅಭಿಪ್ರಾಯ ನೀಡಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸರ್ವ ಸಂಘಟನೆಗಳು ಮತ್ತು ತಜ್ಞರಿಗೆ ಧನ್ಯವಾದಗಳು.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

JA. ±. µiÈzÊUÒq
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು

ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ
ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು
ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು

## ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿಗಳ ವಿವರ

**ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು**

**ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ** : ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

### ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ

**ಅಧ್ಯಕ್ಷರು**

**ಶ್ರೀಮತಿ ಎಸ್.ವಿ. ದೇಶಪಾಂಡೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಆರ್.ಪಿ.ಡಿ ಕಾಲೇಜ್, ಬೆಳಗಾವಿ.

**ಸದಸ್ಯರು**

**ಶ್ರೀಮತಿ ಕಿಶೋರಿ ಡಿ. ಜೋಷಿ** : ನಿವೃತ್ತ ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, GI ಬಾಗೇವಾಡಿ ಕಾಲೇಜು, ನಿಪ್ಪಾಣಿ.

**ಪ್ರೊ.ಎಸ್.ಎಸ್. ಚೌಹಾನ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, ಮರಾಠಿ ಮಂಡಲ ಕಾಲೇಜು, ಬೆಳಗಾವಿ

**ಶ್ರೀಮತಿ. ಅಲಕಾ ಮುತ್ಕೇಕರ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠ ಮಂಡಳ ಕಾಲೇಜು.

**ಡಾ.ಎಸ್.ಎಂ ರಾಯಮಾನೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಕೆ.ಎಲ್.ಇ, ಬಿ.ಕೆ ಕಾಲೇಜು, ಚಿಕ್ಕೋಡಿ.

**ಶ್ರೀ.ಪ್ರಕಾಶ್ ಬಿ.ನಾಗರ್ಲೆ** : ನಿವೃತ್ತ ಶಿಕ್ಷಕರು, ಮುನಿಸಿಪಲ್ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ನಿಪ್ಪಾಣಿ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

### ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿ

**ಶ್ರೀ ಸರಜು ಕಾಟ್ಕರ್** : ಮಹಾಂತೇಶ್ ನಗರ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಶ್ರೀ ರಾಮಕೃಷ್ಣ ಮಾರುತಿ ಮರಾಠೆ** : ಶ್ರೀಕಲ್ಪ, ಶಾಂತಿ ನಿಕೇತನ, ಟೀಚರ್ಸ್ ಕಾಲೋನಿ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಡಾ. ಗೋಪಾಲ್. ಎಸ್. ಮಹಾಮುನಿ ಅಲಿಯಾಸ್ ಸುತಾರ್** : ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಶಾಂತಿನಗರ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

**ಸಲಹೆ ಮತ್ತು ಮಾರ್ಗದರ್ಶನ:**

¼Ê JA. ±. µiÈzÊÚ0q : ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

¼ÊµÊw JA. r. G½È, : ಉಪನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

**ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಸಂಯೋಜಕರು:**

**ಎಲ್. ಶಂಕರೇಗೌಡ,** : ಸಹಾಯಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

# अनुक्रमणिका

D3W6A1


| अ.क्र. | पाठाचे / कवितेचे नाव | साहित्य प्रकार | लेखक/कवी | पृ.क्र. |
|---|---|---|---|---|
| *1. | तो राजहंस एक | भावकविता | ग.दि. माडगुळकर | 1 |
| 2. | दिव्य दृष्टी | कथा | डॉ. विजया वाड | 4 |
| *3. | चल ऊठ रे मुकुंदा | भूपाळी | सुरेश भट | 12 |
| 4. | सुखाची चव | ललित | डॉ. अरुणा ढेरे | 14 |
| *5. | हा हिंद देश माझा | देशभक्ती गीत | आनंदराव टेकाडे | 18 |
| 6. | चिंगी महिन्याची झाली नाही तोच... | नाट्य छटा | दिवाकर | 21 |
| 7. | तिथे! | निसर्ग कविता | गणेश हरी पाटील | 25 |
| 8. | अतिथी | ग्रामीण कथा | वा. कृ. चोरघडे | 30 |
| 9. | दीप लाव तो | सामाजिक कविता | कुसुमाग्रज | 38 |
| 10. | रामेश्वरम्‌चे दिवस | आत्मचरित्र | प्रा. माधुरी शानभाग | 41 |
| 11. | पाहुणचार | ग्रामीण कविता | ग.ल. ठोकळ | 49 |
| 12. | वाट चुकल्याचा आनंद | लघुनिबंध | ना.सी. फडके | 53 |
| | व्याकरण, लेखन, शब्दसंग्रह | | | 58 |


*** अशी खूण असलेल्या कविता पाठांतरासाठी आहेत**

अज्ञा

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 1. तो राजहंस एक

(मूल्य : आत्मविश्वास)

Q4P5R9

**- ग.दि. माडगूळकर**

**परिचय :-**

गजानन दिगंबर माडगूळकर (1919-1977) प्रसिद्ध कवी, कथाकार, कादंबरीकार, पटकथा लेखक. जोगिया, चैत्रबन, गीतरामायण इत्यादी काव्यसंग्रह, 'आकाशाची फळे' ही कादंबरी, 'वाटेवरच्या सावल्या' हे आत्मचरित्र मराठमोळ्या जीवनाचे विविधरंगी चित्रण, उत्कट भावनाशीलता, प्रसथ रसाळ आणि नाट्यपूर्ण शैली ही लेखन वैशिष्ट्ये. गीतरामायणाच्या रचनेनंतर 'आधुनिक वाल्मिकी' म्हणून ओळखले जाऊ लागले.

एका तळ्यात बदकाच्या पिलांबरोबर एक राजहंसाचे पिल्लू पण वाढत असते. बदकाची पिल्ले त्याला वेगळा म्हणून वाईट वागणूक देत असतात. त्यामुळे ते पिल्लू दुःखी असते. सर्वांहून वेगळे पोहत असते. पण एकदा त्या कुरूप पिल्लाच्या जीवनात वेगळाच दिवस उगवतो. चोरून पाण्यात पाहताना आपले प्रतिबिंब हे राजहंसाचे आहे हे त्याला उमगते आणि आनंदाच्या भरात त्याचे भय वाऱ्याबरोबर उडाले आणि आत्मविश्वास जागृत झाला. त्याची कमीपणाची भावना संपली.

हे भावगीत 'गदिमा साहित्यनवनीत' या संग्रहातून निवडले आहे.

*(मूल्य - आत्मविश्वास)*

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## तो राजहंस एक

एका तळ्यात होती, बदके पिले सुरेख
होते कुरूप वेडे, पिल्लू तयात एक

कोणी न त्यास घेई, खेळावयास संगे
सर्वाहुनी निराळे, ते वेगळे तरंगे
दावुनी बोट त्याला, म्हणती हसून लोक
आहे कुरूप वेडे, पिल्लू तयात एक

पिल्लास दुःख भारी, भोळे रडे स्वतःशी
भावंड ना विचारी, सांगेल ते कुणाशी
जे ते तयास टोची, दावी उगाच धाक
होते कुरुप वेडे, पिल्लू तयात एक



एके दिनी परंतु, पिल्लास त्या कळाले
भय, वेड पार त्याचे, वाऱ्यासवे पळाले
पाण्यात पाहताना, चोरूनिया क्षणैक
त्याचेच त्या कळाले, तो राजहंस एक.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ व टीपा :-**

| | | | |
|---|---|---|---|
| सुरेख | - सुंदर | कुरूप | - विद्रूप, दिसण्यास चांगले नसलेले |
| संगे | - बरोबर, सह | तरंगे | - पोहणे |
| धाक | - दरारा, जरब | दिन | - दिवस |

**राजहंस :-**

मानस सरोवरात दिसून येणारा एक दुर्मिळ पक्षी. हा पांढऱ्या काळ्या रंगाचा बदकाच्या जातीचा पक्षी आहे. हा पक्षी मोत्याचा चारा खातो आणि दूध व पाणी वेगळे करतो अशा त्याच्याबद्दलच्या दंतकथा (मिथक) प्रसिद्ध आहेत.

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नाचे प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. बदकाची पिल्ले कशी होती?
2. ते पिल्लू वेगळे का तरंगत होते?
3. त्या पिल्लाला कोण विचारत नसे?

**प्र2. खालील प्रश्नाचे दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1. लोक हसून काय म्हणत असत?
2. पिल्लास कोणते दु:ख होते?
3. राजहंस असल्याचे पिल्लाला केव्हा कळाले?

**प्र3. खालील प्रश्नाचे उत्तर पाच-सहा वाक्यात लिहा.**

1. कुरूप पिल्लास इतर पिले कशी वागणूक देत असत?

**प्र4. खालील प्रश्नाचे उत्तर सात-आठ वाक्यात लिहा.**

1. या कवितेचा अर्थ तुमच्या शब्दात लिहा.

**प्र5. संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1. आहे कुरूप वेडे पिल्लू तयात एक
2. त्याचेच त्या कळाले तो राजहंस एक

**प्र6. भाषाभ्यास**

1. विरुद्धार्थी शब्द लिहा.
   - दु:ख
   - कुरुप
   - प्राचीन
2. समानार्थी शब्द लिहा.
   - संग
   - धाक
   - सुरेख
3. विग्रह करून संधी ओळखा
   - क्षणैक

**प्र7. खालील प्रश्नाचे प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. योग्य तो पर्याय निवडून पुढे लिहा.**

1. या कवितेत कोणत्या पक्षाचे वर्णन केले आहे?
   अ. बदक ब. पोपट क. कावळा ड. राजहंस
2. बदकाची पिल्ले कुठे रहात होती?
   अ. तळ्यात ब. पिंजऱ्यात क. समुद्रात ड. घरट्यात
3. गीतरामायणच्या रचनेनंतर ग.दि. माडगूळकराना कोणत्या नावाने ओळखले जाते?
   अ. गीतरामायणकार ब. आधुनिक वाल्मिकी
   क. ग.दि.मा. ड. श्रीराम
4. या कवितेचा काव्य प्रकार हा आहे.
   अ. प्रेमगीत ब. देशगीत क. भावगीत ड. बालगीत

**उपक्रम :**

1. मृत्युंजय ही शिवाजी सावंत यांची कादंबरी वाचा.
2. 'राजहंस' या पक्षाची अधिक माहिती मिळवा.

*********

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 2. दिव्य दृष्टी

H7E9L1

**- डॉ. विजया वाड**

**परिचय :-**

डॉ. विजया विजय वाड (1945) शिक्षण बी.एस.सी., बी.एड., एम.ए., पी.एच.डी. बाल साहित्याची आवड, नाटके रंगभूमीवर आणण्याची आवड, मराठी विश्वकोष मुख्य संपादक, मराठी अभिनेत्री-निशिगंधा वाड ही त्यांची कन्या होय. नाटकांची नांवे - चिंगु चिंगम टिंकु टिंकम, दोन मित्र, मिनी मंगळावर.

शारीरिक व्यंग असले तरी मनुष्याकडे वेगळीच शक्ती असते. तिचा उपयोग होतो हे या पाठात पहा.

हा पाठ ''किशोर दिवाळी अंक-2010'' मधून घेतला आहे.

*(मूल्य-जिद्द)*

''शिवांगी, मी आज घरी जाणार पळस्पे इथे!''

गौरी सांगत होती. दोघी एकाच वर्गात नि एकाच खोलीत अंधशाळेच्या वसतिगृहात राहत असत.

''वा! छान! कोणी येणार आहे का न्यायला?'' शिवांगी म्हणाली.

''हो, अगं दादा, आई, बाबा तिघेही येणार आहेत. आम्ही अगदी जिवाची मुंबई करणार आहोत, तिथे चौपाटीवर जाऊन लाटांशी खेळणार, नेहरू पार्कमधील म्हातारीचा बूट बघणार.''

''मज्जाच गं!'' शिवांगी म्हणाली.

''हो ना, आता महिनाभर अगदी मज्जा करणार आहे मी! आमचं पळस्पं छोटं असलं तरी मस्त आहे. शिवाय घरची भाजी पोळी! आईच्या हातचे गुळाचे घारगे, बाबा मळ्यातून कैऱ्या आणतात, आणि दादा बर्फाचा गोळा खायला देतो. मज्जाच मज्जा! मला तर वाटतं, मे महिना कधी संपूच नये. आपली शाळा पण आवडते! पण मला इथलं जेवण अजिबात आवडत नाही. आमटी, भाजी सगळ्याची चव एकच एक!'' गौरी म्हणाली.

''शिवांगी तू कुठे जाणार?''

''मी?''

लगेच गौरीच्या मनात आलं, शिवांगीची आई देवाघरी गेली होती. तिला एकदम अपराध्यासारखं वाटलं.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

‘‘गौरी!’’

दादा आला! दादा आला! दादा,  तिची आई, तिचे बाबा, सगळे सगळे आले होते.

‘अरे शिवांगी, तू इथेच आहेस अजून? तुला न्यायला आले नाहीत कोणी?’’

‘‘अरे दादा विसरलास? शिवांगी......!’’

‘‘ओ! सॉरी, सॉरी! मी विसरलो गं, पण आज मात्र शिवांगीसह आपण सगळेच जिवाची मुंबई करूयात!’’ आणि आपण मुंबई दर्शनच्या बसनेच सगळे जाऊयात!’’ दादाचा आवाज उत्साहभरा होता.

‘‘अरे दादा, तू म्हणशील तसंच आपण करू!’’ बाबांनी असे म्हटले, तेव्हा गौरीने शिवांगीला आनंदाने मिठीच मारली.

शिवांगी त्या चौघाबरोबर ‘मुंबईदर्शन’ सहलीसाठी मुख्याध्यापिका कुंदाताईंची परवानगी घेऊन निघाली.

दादा, गौरी, शिवांगी तिघे कमला नेहरू पार्कमध्ये फिरत होते. म्हातारीचा बूट आपल्या हातांनी स्पर्श करून शिवांगी नि गौरी बघत होत्या.

तिथल्या बागेत गप्पा मारत दोघी बसल्या होत्या.

तेवढ्यात ‘‘अग गप्पा काय मारत बसलात? बस निघून जाईल, असे म्हणत आई आली आणि त्या निघाल्या.

‘‘चल शिवांगी, आता तू माझ्याजवळ बस.’’ आई म्हणाली. आई आणि शिवांगीच्या गप्पा सुरू झाल्या.

‘‘यंदा तुम्ही दोघी नववी पास होऊन दहावीत गेलात. शिवांगी तुला तर नव्वद टक्के गुण मिळाले. काय करायचं ठरवलय तू?’’ गौरीच्या आईने विचारले.

‘‘मला गुप्तहेर व्हायचं आहे गौरीची आई!’’

‘‘अगं! केवढा वेगळा विचार आहे हा!’’

‘‘पण, छान आहे हं!’’

‘‘अग, जगाला कल्पनाच नसते अंधव्यक्तिची ताकद काय असते ते! पण माझ्या गौरीमुळे मला कल्पना आहे त्याची. किती आत्मसिद्ध आहे ती!’’

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

‘‘पण काकू ती आत्मसिद्ध होण्यास तुम्हीच कारण आहात ना? किती छान वाटलं काकू म्हणालीस ते! गौरीची आई म्हणून हाक मारतेस त्यापेक्षा काकू खूप जवळचं वाटतं बघ!’’ असे म्हणत गौरीच्या आईने शिवांगीचा हात हातात घेतला. शिवांगीने तो कुरवाळला.

‘‘अरे वा! काय सुरेख घडणीच्या बांगड्या आहेत काकू!’’

‘आवडल्या? ह्यांनी हौसेनं घेतल्या. तीस एप्रिलला, वाढदिवसाला माझ्या.’’

‘‘चला चौपाटी आली गिरगावची. इथे तीस मिनिटे वेळ मिळेल. इथे भेळीचे स्टॉल नाहीत. धावाधाव करू नका. त्यानंतर बस भेलपूरी, पाणीपूरी स्टॉलवर थांबवली. सगळेजण आनंदाने खाली उतरले. तोवर समोरच शहाळंपाणीवाला आला ‘‘चल गं शिवांगी! आपण शहाळंपाणी घेऊ’’ गौरीची आई म्हणाली.

‘‘बरं काकू! तुम्ही शहाळंपाणी घ्या, मग आपण जाऊ’’ शिवांगी म्हणाली.

दोघी शहाळपाणीवाल्या जवळ गेल्या. इतक्यात एका माणसाने गौरीच्या आईच्या हाताला जोराचा हिसडा दिला. त्याचे तोंड झाकले होते. ‘‘अगं आई गं!’’ गौरीची आई कळवळली. शिवांगी चटकन पुढे झेपावली. त्या माणसाचा हात पकडण्याचा प्रयत्न करताना तिचा स्पर्श त्याच्या पाठीला झाला. त्याने शिवांगीच्या थोबाडात मारली व तो पळाला. हे इतक्या क्षणार्धात घडले की, कोणाला कळायच्या आत चोर बांगड्या घेऊन पळालाही.

‘‘धावा! धावा! माझ्या सोन्याच्या बांगड्या पळविल्या मेल्यानं ’’ गौरीची आई धायमोकलून रडू लागली. ही गर्दी जमली. खेळायला गेलेले दादा, बाबा आणि गौरी परतले. त्यानी विचारले - ‘‘काय झालं गं?’’ ‘‘अहो माझ्या बांगड्या, तुम्ही हौसेने घेतलेल्या माझ्या सोन्याच्या बांगड्या-’’ तिला हुंदका फुटला.

‘‘गेल्या? चोरीला गेल्या? चला! काय गरज होती सोनं अंगावर वागवत फिरायची. मिरवायची हौस ना? तुमची हौस होते. पण आमचा जीव जातो.’’ बाबा वैतागून ओरडले. ‘‘जाने दो काका! अभी पहले पुलीस कंप्लेट लिखवाओ!’’ शहाळंपाणी विकणारा म्हणाला. तो शहाणपणाने सल्ला देतो आहे हे गौरीच्या बाबानांही समजले.

‘‘चला!’’ ते रागारागाने जवळच्या पोलीस ठाण्यावर गेले. ‘मुंबई दर्शन’’ अर्धवट राहिले. सहलीच्या बसमधील लोक हळहळत पुढे गेले.

पोलीस ठाण्यावर गेल्यावर शिवांगी म्हणाली, ‘‘काका या तपासात माझा नक्की उपयोग होईल!’’ समोरच बसलेले इन्स्पेक्टर राणे तिला म्हणाले.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

‘‘बाळ तू होतीस यांच्याबरोबर?’’

‘‘शिवांगी, हे इन्स्पेक्टर राणे तुला काही प्रश्न विचारताहेत’’ काका म्हणाले.

‘‘राणेसाहेब, नमस्कार! मी काकूबरोबर होते.’’

‘‘पण तू पाहू शकत नाहीस.’’

काकू म्हणाल्या, ‘‘मी पाहू शकते ना, मेल्याने तोंडाला काळे फडके बांधले होते.’’

‘‘स्कूटरवर होता?’’ ‘‘नाही हो, नंतरही पळतच गर्दीत मिसळला.’’

‘‘ठीक आहे. आपण लेखी तक्रार नोंदवा. सायंकाळी या. मी काही चोर हजर करतो, पाहुया! मी मदत करीनच!’’

‘‘आम्ही लांबून आलोय हो! कुठे जाणार आता, इथेच बसून राहतो.’’ राणे साहेबांनी सर्वांना चहा-बिस्किटं दिली. वारंवार चोऱ्या करणाऱ्या त्या त्या भागातील माणसांची पोलिसांना चांगलीच माहिती होती. त्यांनी तीन तासात काही चोरांना राणेसाहेबांसमोर उभे केले. राणेसाहेबानी शिवांगीला आठवणीने आत बोलावले.

‘‘शिवांगी! इथे काही माणसे मी तुझ्यासमोर आणतो.’’

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



''चालेल! पण त्यांच्या पाठीला स्पर्श करण्याची मला परवानगी हवी''

''दिली!'' इन्स्पेक्टरसाहेब म्हणाले.

चार लोक समोर आले. पाठी चाचपून झाल्या पण एकही नाही. पाचवा, पुढे आला. शिवांगीने खोल श्वास घेतला.

''मोगरा!'' ती उद्‌गारली.

''म्हणजे?''

''मोगऱ्याच्या अत्तराचा वास!'' ती उद्‌गारली.

''पाठ बघू!'' आणि पाठ बघताच ती किंचाळली, ''हाच तो....!'' राणेसाहेब उठून उभे राहिले.

''इन्स्पेक्टर-साहेब, त्या बांगड्या चोराला मी बघू शकत नव्हते, पण हुंगू शकत होते. त्याने मोगरा सेंटच वापरला होता. आमचे स्पर्श खूप बघतात. खूप बोलतात. मी त्याची पाठ स्पर्शिली आहे. तिथे एक आवाळू होते, हे इथे....!'' तिचा हात त्याच्या पाठीवरील आवाळूवर होता.

'कमालकी लडकी है ये!'' राणेसाहेब म्हणाले.

''काय सुरतीलाल? तेरेको कबूल है चोरी?''

सुरतीलाल खाली मान घालून उभा होता.

''तो काय नाकबूल करेल? त्याला वाटले असेल. अंधोंको क्या खबर? पण हे बघ माझे नाक तेज आहे. आणि कान खोलून ऐक, ही माझी दोन हातांची दहा बोटे आहेत ना, ते दहा डोळे आणि एक अंतःचक्षू. मजजवळ अकरा डोळे आहेत. अकरा! आहे तुझ्याकडे दिव्यदृष्टी?''

राणेसाहेब आणि सगळेच शिवांगीकडे कौतुकाने बघत होते. तिच्या मुखावर दिव्यतेज पसरले होते.

सुरतीलालकडून बांगड्या परत मिळाल्या आणि शिवांगीला बक्षीस आणि सुंदर सुट्टी! काका-काकू, दादा आणि गौरीबरोबर! हौसेची आणि आनंदाची किती मजा ना! दोस्तानो.

**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | | |
|---|---|---|---|
| पळस्पे | - कोकणातील एक गाव | चौपाटी | - समुद्राजवळील मोकळी जागा |
| मस्त | - छान | देवाघरी जाणे | - मरण पावणे |

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | | |
|---|---|---|---|
| जीवाची मुंबई करणे | - मौज-मजा करणे, चैन करणे | हेर | - जासूज, गुप्त बातमी काढणारा. |
| शहाळे | - अतिशय गोड पाणी असलेला कोवळा नारळ. | धायमोकलून रडणे | - मोठ्याने रडणे. |
| हळहळणे | - दुःख करणे. | आत्मसिद्ध | - खंबीर |
| आवाळू | - शरीरावर आलेली चरबीची गाठ | अंतःचक्षू | - आतील डोळे, मनाचे डोळे |
| खबर | - बातमी, वार्ता, (या पाठात) कळणार | अंधशाळा | - अंध विद्यार्थ्यांना शिकविले जाते ती शाळा. |
| म्हातारीचा बूट | - मुंबईच्या नेहरू पार्कमधील बुटाच्या आकाराची इमारत. | पार्क | - बगीचा. |
| वसतिगृह | - राहण्याची व्यवस्था असणारे ठिकाण. | गुप्तहेर | - गुन्ह्याचा शोध घेणारा |
| घारगे | - कणकेत गूळ घालून केलेली पुरी | | |

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. गौरीला न्यायला कोण कोण येणार होते?
2. गौरी व इतर मंडळी 'जिवाची मुंबई' करायला कशाने गेले?
3. शिवांगीने गौरीच्या आईला कोणत्या नावाने हाक मारली?
4. चोराने काय चोरले?
5. शहाळेपाणीवाल्याने कोणता सल्ला दिला?
6. शिवांगीने कोणत्या वासावरून चोर ओळखला?

**प्र2. खालील प्रश्नांची प्रत्येकी दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1. गौरीला पळस्पेला काय काय खायला मिळणार होते?
2. गौरी जिवाची मुंबई कशी करणार आहे?
3. गौरीची आई धायमोकलून का रडू लागली?
4. आईला बांगड्या कोणी व केव्हा घेतल्या होत्या?

**प्र3. पुढील प्रश्नांची प्रत्येकी चार-पाच वाक्यात उत्तरे लिहा.**

1. गौरी आणि शिवांगीने मुंबई दर्शनमध्ये काय काय आणि कसे पाहिले?
2. शिवांगीने चोराला कशा पद्धतीने ओळखले?
3. राणेसाहेबांनी तपासणीची पूर्व तयारी कशी केली?

**प्र4. खालील प्रश्नांची सात ते आठ वाक्यात उत्तरे लिहा.**

1. इन्स्पेक्टर आणि इतर सर्वजण शिवांगीकडे कौतुकाने का बघत होते?
2. मोठेपणी गुप्तहेर बनण्याचे कोणते गुण शिवांगीच्या अंगी दिसून येतात?

**प्र5. संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1. ''आज मात्र शिवांगीसह आपण सगळेच जिवाची मुंबई करू!''
2. ''मला गुप्तहेर व्हायचं आहे गौरीची आई!''
3. ''पण तू पाहू शकत नाहीस''
4. ''जाने दो काका! अभी पहले पुलीस कंप्लेट लिखवावो!''
5. ''तुमची हौस होते पण आमचा जीव जातो.''
6. ''कमालकी लडकी है ये!''

**प्र6. खाली दिलेल्या पर्यायातून योग्य उत्तर दिलेल्या जागेत लिहा.**

1. गौरीच्या गावाचे नाव काय?
   अ. मुंबई ब. पळसवणे क. पळस्पे ड. पाळींद्रे
2. गौरीबरोबर अंधशाळेच्या वसतिगृहात कोण रहात होते?
   अ. शिवांगी ब. शिवानी क. शुभांगी ड. सुहानी
3. शिवांगीची आई कोठे गेली होती?
   अ. माहेरी ब. देवाघरी क. सासरी ड. मावशीच्या घरी
4. शिवांगीला किती गूण मिळाले होते?
   अ. 92% ब. 85% क. 90% ड. 95%
5. राणेसाहेबांनी सर्वांना काय दिले?
   अ. चहा-बिस्किटं ब. चहा-पाव क. पेढे-लाडू ड. कॉफी-बिस्कीट
6. बाबा मळ्यातून काय आणतात?
   अ. काकडी ब. कैऱ्या क. फणस ड. जांभळे
7. शिवांगीला काय व्हायचं होते?
   अ. पोलीस ब. वकील क. गुप्तहेर ड. डॉक्टर

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**भाषाभ्यास :-**

**पुढील वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा -**

1. जिवाची मुंबई करणे.
2. धाय मोकलून रडणे.
3. हळहळणे
4. देवा घरी जाणे.

**उपक्रम :-**

1. अंधशाळेला भेट द्या. व तेथील शिक्षण पद्धतीची माहिती मिळवा.
2. पोलिस ठाणयाला भेट देवून तेथे चालणाऱ्या कार्यपद्धतींचे निरिक्षण करा.

❇❇❖❖❖❖❖❇❇

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# 3. चल ऊठ रे मुकुंदा

N4X1T1

**- सुरेश भट**

**परिचय :-**

सुरेश श्रीधर भट (1932-2003) मराठीतील एक प्रसिद्ध कवी. यानी मराठीत गझल या काव्य प्रकाराचे पुनरुज्जीवन केले व त्याला आशयसंपन्न असे नवे रूप दिले. त्यामुळे गझल या प्रकाराला बहुमान्यता मिळाली. त्यांनी निसर्ग कविता, सामाजिक कविता, प्रेम कविता, देशभक्तीपर गीते वगैरे लिहिली आहेत. 'रुपगंधा', 'रंग माझा वेगळा' हे त्यांचे काव्य संग्रह आहेत. 'गेयता' हे त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य आहे. काव्याबद्दल त्यांना दमाणी, केशवसुत पुरस्कार मिळाले आहेत. 'रंग माझा वेगळा' मधून ही कविता निवडली आहे. या कवितेचा प्रकार भूपाळी आहे.

प्रस्तुत कवितेत श्रीकृष्णाला जागवत असल्याचे वर्णन, तसेच प्रातःकाळच्या निसर्ग सौंदर्याचे वर्णन केले आहे.

*(निसर्ग वर्णन - वात्सल्य)*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

चल ऊठ रे मुकुंदा झाली पहाट झाली।
बाहेर चांदण्याला हलकेच जाग आली ।।धृ।।
मंदावला कधीचा गगनात शुक्रतारा
अन् चोरपावलांनी आला पहाटवारा
गालावरी उषेःच्या आली हळूच लाली ।।1।।
घे आवरून आता स्वप्नातला पसारा
बेचैन गोकुळाने केला तुझा पुकारा
तव गीत गात सारी ही पाखरे उडाली ।।2।।
तुज दूर हाक मारी कालिंदीचा किनारा
कुंजातल्या कळ्यानी केला तुला इशारा
तुज शोधण्यास वेडी राधा पुन्हा निघाली ।।3।।



**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | |
|---|---|---|
| उषा | - | पहाट |
| कुंज | - | वृक्षवेलिनी बहरलेली बाग |
| इशारा | - | सूचना. |
| कालिंदी | - | यमुनानदी |
| शुक्रतारा | - | एक ग्रह-पहाटे व सायंकाळी उगवणारा |

**टीप :-**

राधा - गोकुळात राहणारी अनय नावाच्या गवळ्याची पत्नी. कृष्णाची बाल मैत्रीण, श्री कृष्णाची भक्त.

# स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. यशोदा कोणाला उठवत आहे?
2. पहाटवारा कसा आला?
3. बेचैन गोकुळाने कोणाचा पुकारा केला?

**प्र2. खालील प्रश्नाचे दोन-तीन वाक्यात उत्तर लिहा.**

1. गोकुळ बेचैन का झाले होते?

**प्र3. खालील प्रश्नाचे उत्तर चार-पाच वाक्यात लिहा.**

1. कृष्णाला उठविण्याच्या वेळी सृष्टीत काय घडले होते?

**प्र4. संदर्भासह स्पष्टीकरण करा -**

''तव गीत गात सारी ही पाखरे उडाली''

**प्र5. खालील प्रश्नाचे उत्तर सात-आठ वाक्यात लिहा.**

1. या कवितेचा सरळ अर्थ लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र6. जोड्या जुळवा -**

| अ | ब |
|---|---|
| 1. चांदण्याला | 1. चोरपावलांनी |
| 2. शुक्रतारा | 2. हाक मारी |
| 3. पहाटवारा | 3. जाग |
| 4. कालिंदीचा किनारा | 4. इशारा केला |
| 5. फुलांनी (कळ्यांनी) | 5. मंदावला |

**भाषाभ्यास** - चांदण्याला जाग आली, चोर पावलानी पहाट वारा आला या ओळीत अचेतन गोष्टीवर मानवी भावनांचा आरोप केला आहे. म्हणून हा चेतनगुणोक्ती अलंकार आहे. या कवितेतील अशा अलंकाराची उदाहरणे शोधा.

**उपक्रम**

1. ही भूपाळी चालीत बसवून म्हणा.
2. ऊठ पंढरीच्या राया ही ग.दि.माडगूळकरांची भूपाळी मिळवून वाचा.

**❖*❖*❖**

# 4. सुखाची चव

- अरुणा ढेरे

**परिचय :-**

डॉ. अरुणा रामचंद्र ढेरे (जन्म 1957) कविता, कथा, कादंबरी ललित गद्य, समीक्षा, संशोधन असे विविध प्रकारचे लेखन. 'उर्वशी,' 'मैत्रेयी', 'महाद्वार' इ. कादंबऱ्या. 'मंत्राक्षर', 'यक्षरात्र', 'निरंजन' इ. कविता संग्रह. 'रुपोत्सव', 'लावण्ययात्रा', 'मनातलं आभाळ' इ. ललित गद्य संग्रह प्रसिद्ध आहेत.अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यानी भूषविले

सुट्टीत मुलाना खेळायला आवडते. अनेक गमती-जमती करायला मिळतात. त्यामुळे मुलांना सुट्टी आवडते. लेखिकेला बालपणी आवडीच्या अनेक गोष्टी सुट्टीत मिळायच्या त्यासाठी त्या सुट्टीची वाट पाहायच्या, पण अनेक बाबतीत वाट पाहणे सुद्धा आनंदाचे, जिज्ञासेचे, कुतुहलाचे असते. याचे चित्रण या ललित लेखात आले आहे.

*(मूल्य-संयम)*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

होळी नंतर थंडी झपाट्यानं कमी होत जायची आणि आंब्यावर मोहोर नुसता घमघमत असायचा. परीक्षा तोंडावर आलेली असायची. घरापुढच्या छोट्या गॅलरीत झोपायला परवानगी मिळायची. मोकळ्या अंगणात अंथरुणं पडायची ती सुट्टी लागल्यावर, पण मार्च-एप्रिलमध्ये गॅलरीत झोपायला मिळायचं. तेव्हा वाऱ्याची मंद झुळूक घेत आम्ही बहीण-भाऊ अंथरुणावर पडायचो. खूप वेळ गप्पा करत राहायचो. मग रात्रीचे मऊगार हात अंगावर फिरायला लागले, की झोपेची गडद चाहूल यायची. डोळे मिटताना मनात एकच विचार यायचा, 'उद्या कोकिळेचं कुहू ऽ ऽ ऐकू येईल? बघू हं!'

पहाटे पहाटे गाढ झोपेत असतानाच तो आवाज कानावर यायचा 'कुहू कुहू' आणि पापण्या टक्क उघडल्या जायच्या. त्या आवाजाची वाट पाहण्याचं सार्थक होऊन जायचं.

सुट्टीची वाट पाहणं तर तेव्हापासून सुरू झालेलंच असायचं. अभ्यासाचा आळस नसायचा. पाठांतर आवडायचं. नेमलेली पुस्तकं गोष्टीच्या पुस्तकांइतकीच परत परत आवडीनं वाचली जायची. पण अभ्यासाची वही व पुस्तक जरा बाजूला झालं रे झालं, की सुट्टीची आठवण उसळी मारून वर यायची. ते अंगणातलं हजारी मोगऱ्याच झाड, शनिवार-वाड्यात सकाळी सकाळी जाऊन वेचून

आणलेली बकुळीची फुलं, माठातलं वाळा घातलेलं पाणी, आई-आत्यांची कुरड्या पापड्यांची घाई, अंगणभर पडणारी वाळवणं, कैरीची डाळ आणि पन्हं, कधीमधी घरची परवानगी मिळाल्यावर चोखायला मिळणारे बर्फाचे गोळे, ऊसाचा ताजा रस आणि मुख्य म्हणजे खूपच खूप गोष्टींची आणि कवितांची नवी पुस्तकं ..... सुट्टीची किती वाट पाहात असू आम्ही!

कधी एकदा परीक्षा संपून सुट्टी लागतेय आणि कधी वरच्या माळ्यावर खिडकीतून झिरपणाऱ्या अर्धवट उजेडात पुस्तकं वाचत बसायला मिळतंय अस मला होऊन जाई.

पुस्तकाची वाट पाहण्यात आणखी एक गंमत होती. एक वेगळंच जग तिथं भेटत होतं. न पाहिलेला देश, न पाहिलेली माणसं, न अनुभवलेले प्रसंग, अनोळखी तरीपण आपले वाटणारे, ओळखीचे धागे जुळणारे. न जुळणाऱ्या गोष्टींसुद्धा किती थक्क करणाऱ्या! म्हणजे जग असही असतं तर...! मला केवढंतरी नवेपण भेटत होतं आणि शब्दांची जादू कळत होती. मी वाचत होते त्या गोष्टी, तो इतिहास, जी गाणी कुणीतरी रचलेली होती. लिहिलेली होती, जे सुचलं, जे लिहावंसं वाटलं ते कसं लिहू शकली आहेत ही माणसं! मला भाषेची ताकद समजत होती. म्हणून पुस्तक वाचण्याची वाट पाहण्यात उन्हाळ्याच्या आधीचा काळ इतका वेड लावायचा, की बस्स!

अलिकडे एकदा एक सुरेख परदेशी सिनेमा पाहिला. चिनी सिनेमा. 'पोस्टमन इन द माउंटन' हे त्याचं नाव. पहाडी प्रदेशामधला एक जुना पोस्टमन आजारी पडतो. त्याच्या जागी त्याच्या मुलानं काम करायचं ठरतं. मुलगा काही फारसा उत्सुक नसतो त्या कामाला, पण शेवटी पत्राची थैली पाठीवर घेऊन निघतो. त्याचे वडील त्याच्या बरोबर असतात.

एका वस्तीवर दोघं बाप-लेक येतात. तिथं एका झोपडीपाशी एक आंधळी म्हातारी बसलेली असते. पोस्टमन आल्याचं तिला बरोबर समजतं. ती आनंदून जाते. वडील पुढे होतात. मुलगा मागेच रेंगाळतो. मग वडिलांनी दिलेलं पत्र हातात घेऊन ती स्पर्शानं त्याचा आनंद भोगते. पोस्टमनला ते वाचायला सांगते. एकदा त्या म्हातारीकडे वडील पाहतात आणि पत्र वाचतात. म्हातारीच्या मुलानं तिला पाठविलेलं ते पत्र असतं. त्यानं आपल्या आईची खूप प्रेमानं विचारपूस केलेली असते. तिला घेऊन जायला तो लवकरच येणार असल्याचं त्यानं लिहिलेलं असतं. ते सगळ ऐकताना म्हातारीच्या तोंडावर खूप समाधान पसरतं.

मुलगा थोड्या अनिच्छेनंच जेव्हा पुढे येतो, तेव्हा त्याला दिसतं, की बापाच्या हातात मुळी कोराच कागद आहे त्यावर काही लिहिलेलंच नाही. म्हातारी त्याच्या बापाला पुन्हा पुन्हा धन्यवाद देते. आशीर्वाद देते. तिथून लांब आल्यावर मुलाला बाप सांगतो, की ती म्हातारी आपल्या दूर गेलेल्या मुलाची वाट पाहत आहे. त्याच्या पत्राची, त्याच्या येण्याची. मुलगा कधीच तिला पत्र

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

लिहित नाही. तिची चौकशी करत नाही. पण तिचं ते वाट पाहणं पोस्टमनला मात्र सहन होत नाही. त्या म्हातारीला आनंद वाटावा म्हणून दरवेळी पोस्टमन मनानंच कोरं पत्र वाचून आलेला असतो. आणि म्हातारीचे शेवटचे दिवस त्यामुळे समाधानात चाललेले असतात. आता पोस्टमनच्या मुलाला हेच नाटक पुढे चालवायचं आहे.

वाट पाहणं ही गोष्ट एरव्ही सुखाची थोडीच असते? दु:ख, काळजी, भीती, अस्वस्थता, तडफड किती तरी गोष्टी असतात, त्यात भरलेल्या. पावसाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्याचे डोळे आठवा जरा किंवा विठूच्या दर्शनाची वाट पाहणाऱ्या संतांचे अभंग आठवा. त्या करुणेचा स्पर्श झाला की लक्षात येतं. एखाद्या गोष्टीची वाट पाहायला लागते, तेव्हाच तिची किंमत कळत जाते. कित्येक मोलाच्या गोष्टी सहज मिळाल्या, तर त्याचं मोलच आपल्या लक्षात येत नाही. वाट पाहताना आपण संयम शिकतो, धीर धरायला शिकतो. एखाद्या गोष्टीवर विश्वास घट्ट करायला शिकतो. ध्यास वाढत जातो.

हे सगळं एका वाट पाहण्याची गोष्ट करताना सहज मनात येतं आणि वाटतं, की जे हवं ते सहज हाती येऊच नये. थोडी वाट पाहायला लागावी. थोडी तडफड भोगायला लागावी; तरच सुखाची चव वाढेल. यशाची गोडी वाढेल. प्रेमातली मायेतली तृप्ती वाढेल. आणि आयुष्याबद्दलची ओढ ही वाढेल.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**शब्दार्थ -**

मोहोर - आंब्याची फुले चाहूल - येत असल्याची जाणीव, सूचना
टक्क उघडणे - पूर्ण जागे होणे कुहू - कोकिळेचे ओरडणे
सार्थक - सफल
हजारी मोगरा - बत्तीस मोगरा, अनेक फुले एकत्र असलेल्या मोगऱ्याच्या फुलाचा प्रकार
शनिवार वाडा - पुण्यातील पेशव्यांचा वाडा
वाळा - एक प्रकारचे सुगंधी वाळलेले गवत.
कैरीची डाळ - कच्च्या आंब्याचे खिसून डाळीत केलेले मिश्रण (चैत्र गौरीत सुवासिनींना देतात.)
पन्हं - कच्च्या कैरी पासून केलेले पेय.
प्रतिभा - कला निर्मिती करण्याची शक्ती.
अनिच्छेने - इच्छा नसताना
तृप्ती - समाधान
पोस्टमन इन द माऊंटन - डोंगराळ भागातील पोस्टमन (टपाल वाटणारा) एका चिनी चित्रपटाचे नाव

# स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. थंडी केव्हा कमी होत जायची?
2. पुस्तक वाचण्याची वाट पाहण्याचा काळ कोणता?
3. लेखिकेने कोणता चिनी चित्रपट पाहिला?
4. पोस्टमनने कोणाला पत्र वाचून दाखविले?

**प्र2. खालील प्रश्नांची प्रत्येकी दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1. सुट्टीच्या आधीचा काळ भारावलेला का असतो?
2. वाट पाहण्यात कोणकोणत्या गोष्टी असतात?
3. पोस्टमन कोरे पत्र का वाचत असे?

**प्र3. खालील प्रश्नाचे प्रत्येकी चार-पाच वाक्यात लिहा.**

1. लेखिका सुट्टीची वाट का पाहत असे?
2. वाट पाहत असताना आपण कोणकोणत्या गोष्टी शिकतो?

**प्र4. संदर्भासह स्पष्ट करा.**

1. 'जे सुचलं, जे लिहावसं वाटलं ते कसं लिहू शकली आहेत ही माणसं!'

**प्र5. खालील प्रश्नाचे उत्तर सात-आठ वाक्यात लिहा.**

1. सुखाची चव कशी वाढेल?

**प्र6. जोड्या जुळवा -**

| अ | ब |
|---|---|
| 1. कोकिळा | 1. म्हातारीला पत्र |
| 2. चिनी सिनेमा | 2. करुणेचा स्पर्श |
| 3. पोस्टमन | 3. पोस्टमन इन द माऊंटन |
| 4. संतांचे अभंग | 4. कुहू कुहू |

**भाषाभ्यास -**

पुढील वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

1. वेड लागणे 2. सार्थक होणे 3. थक्क होणे 4. मोल समजणे

**उपक्रम**

1. 'वाट' या शब्दावरून तयार होणारे वाक्प्रचार लिहून अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
2. 'गोट्या' हे ना.धों. ताम्हणकराचे पुस्तक वाचा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 5. हा हिंद देश माझा

I6M4G1

**- आ. कृ. टेकाडे**

**परिचय :-**

आनंद कृष्णाजी टेकाडे (1818-1864) हे मूळचे नागपूरचे राहणारे. ते एक राष्ट्रीय बाण्याचे कवी म्हणून ओळखले जातात. 'आनंदगीत' या नावाने त्यांचे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. खड्यासुरात आणि मनोहर चालीवर त्यानी आपल्या कविता गाऊन दाखविल्यामुळे त्या चटकन अधिक लोकप्रिय झाल्या. 'हा हिंद देश माझा' हे त्यांचे देशभक्ती गीत आबाल-वृद्धास परिचित आहे.

*(मूल्य-देशप्रेम)*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

आनंदकंद ऐसा हा हिंद देश माझा
सत्यास ठाव देई
वृत्तीस ठेवि न्यायी

सत्यासी मानी राजा हा हिंद देश माझा
जनकादि राजयोगी
शुक वामदेव योगी

घुमवीति कीर्तिवाजा हा हिंद देश माझा
दमयंति जानकी ती
शीलास भूषवीती

नटली नटेश गिरिजा हा हिंद देश माझा
विश्वास मोह घाली
ऐशी मुकुंद मुरली

रमवी जिथे निकुंजा हा हिंद देश माझा
गंगा हिमाचलाची
वसती जिथे सदाची

होऊनि राहि कलिजा हा हिंद देश माझा
पृथुराज सिंह शिवजी
स्वातंत्र्यवीर गाजी

करिती रणात मौज हा हिंद देश माझा
पूजोनि त्यास जीवें
वंदोनि प्रेमभावे

जयनाद हाचि गर्जा हा हिंद देश माझा

**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शील | - | चारित्र्य | निकुंजा | - | लता, वेली, कुंज |
| हिमाचल | - | हिमालय | कलिजा | - | काळीज, हृदय |
| गाजी | - | पराक्रमी पुरुष, वीर योद्धा | जनक | - | सीतेचे वडील, (जनकराजा-मिथिलाधिपती) |
| नटेश | - | शंकर | गिरीजा | - | पार्वती, उमा, |
| प्रेमभावे | - | प्रेमाने | कीर्तिवजा | - | कीर्तिचा प्रसार करणारा |
| शुक | - | संपूर्ण वैराग्य असलेला वेदकालीन ऋषी, व्यासपुत्र ''शुकासारखे पूर्ण वैराग्य ज्याचे। वशिष्ठापरि ज्ञान योगेश्वराचे ।।'' | वामदेव | - | एक वेदकालीन त्यागी ऋषी, त्याना वामदेव गौतम असेही म्हणतात. |
| सदा | - | नेहमी | | | |

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नाचे प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. हिंद देशाने कोणाला राजा मानले आहे?
2. राजयोगी कोणास म्हटले आहे?
3. विश्वाला मोह कोण घालतो?
4. देशाचे काळीज होऊन कोण राहिले आहे?
5. कोणत्या वीरयोध्द्यांनी शौर्य गाजविले आहे?

**प्र2. खालील प्रश्नाचे दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1. भारत देशाला भूषविणारी स्त्री-रत्ने व वीर पुरुष कोण कोण आहेत?
2. हिंद देश कशा कशामुळे पावन व सुंदर बनला आहे?

**प्र3. खालील प्रश्नाचे उत्तर पाच-सहा वाक्यात लिहा.**

1. हिंद देशात कोण थोर व्यक्ती होऊन गेल्या? त्यांची वैशिष्ट्ये लिहा.

**प्र4. संदर्भासह स्पष्टीकरण करा**

1. सत्यास ठाव देई
2. गंगा हिमाचलाची

**प्र5. खालील प्रश्नाचे उत्तर सात-आठ वाक्यात लिहा.**

1. या कवितेची मध्यवर्ती कल्पना तुमच्या शब्दात लिहा.

**प्र6. पहिल्या जोडीतील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | सत्यास | : ठाव | : : वृत्तीस | : .................. |
| 2. | जनक | : राजयोगी | : : शुक | : .................. |
| 3. | पूजोनी | : जीवे | : : वंदोनी | : .................. |
| 4. | रमवी | : निकुंजा | : : होऊनी राहि | : .................. |
| 5. | रणात | : मौजा | : : जयनाद | : .................. |

**भाषाभ्यास :-**

1. पुढील संधी सोडवा, नावे द्या.
   अ. हिमालय  ब. रणांगण  क. जनकादि
2. अलंकार ओळखून लक्षण सांगा.
   ''आनंदकंद ऐसा । हा हिंद देश माझा।''

**उपक्रम :-**

1. 'माझा हिंद देश' या विषयावर 15 ओळी निबंध लिहा.
2. देशभक्ती गीतांचा संग्रह करा.
3. स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन या वेळी ही देशभक्ती गीते सादर करा.

*********

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 6. चिंगी महिन्याची झाली नाही तोच

**- दिवाकर**

C7J1Y5

**परिचय :-**

दिवाकर म्हणजेच शंकर काशीनाथ गर्गे (1889-1931) नाट्यछटा हा साहित्यप्रकार मराठीत आणणारे हे पहिले रविकिरण मंडळाचे सदस्य होत. ते पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात शिक्षक होते. त्यांचे शिक्षण स्कूल फायनलपर्यंत झाले. तथापि प्रो. वासुदेवराव पटवर्धन यांच्याजवळ त्यानी इंग्लिश नाट्यछटा लेखकांच्या ग्रंथाचे सूक्ष्म अध्ययन केले व नाट्यछटा लिहिल्या. तात्यासाहेब केळकरांना त्यांच्या नाट्यछटा आवडल्या. त्यांनी त्यापैकी काही नाट्यछटा केसरी या वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्या. नाट्यछटा लिहितांना दिवाकर एकेक शब्द किंवा विराम देखील श्रोत्यांच्या मनावर काय परिणाम करील याची चिकित्सा करून मगच लिहीत असत.

ही नाट्यछटा 'दिवाकरांच्या नाट्यछटा, या पुस्तकातून निवडली आहे. या नाट्यछटेत बोलणारे पात्र एकच ते म्हणजे चिंगीची आई! चिंगी एक महिन्याची झाली नाही तोच ही आई मनोराज्य करीत आहे. ती चिंगीशी बोलते आहे म्हणण्यापेक्षा चिंगीबद्दल मनाशी बोलते आहे असे म्हणणे जास्त संयुक्तिक होईल.

*(मूल्य-वात्सल्य)*

NOT TO BE REPUBLISHED @KTBS



माझी चिंगी काळी आहे? मी म्हणते कशी गोरी गोरी पान आहे! हो! हो आता आमच्या चिंगीला सरी करायची, बिंदल्या करायच्या, झालच तर वाळे, साखळ्या सगळे सगळे दागिने करायचे ते! कसा छानदार परकर नेसायचा, पोलके घालायचे अन ठुमकत ठुमकत शाळेत जायचे ना? शाळेत शहाणी होईल बबी माझी! मोठी मोठी बुकं वाचील अन मग....छोनीचं आमच्या लगीन! खरच सोने, तुला नवरा काळा हवा की गोरा? का ऽ ळा? नको गं बाई! छबीला माझ्या कसा नक्षत्रासारखा, अगदी चित्रासारखा नवरा मिळेल हो! अस्से थाटाचे लगीन करीन की ज्याचे नाव ते! आहात कुठे? हजार रुपये हुंडा देईन हजार! ताशे! वाजंत्री, चौघडां हो, हो तर! बेंडबाज्यासुद्धा लावायचा! वरात पण वरात निघेल म्हणावे! नळे चंद्रज्योती झाडे यांचा काय लकलकाट होईल! पण खरेच गडे चिंगे, तू मग भांडाय सवरायची नाहीस ना? जर का घरात भांडलीस, तर पहा मग! माणसाला कसं मुठीत ठेवायला हवे बरं का? संसार पण संसार झाला पाहिजे! आणि हे बघ आपले आधीच सांगून ठेवते, पहिले तुझे

बाळंतपण की नाही इथे व्हायला हवे! पुढची करा हवी तर खुशाल आपल्या घरी! मोठी दैवाची होईल चिंगी माझी! पुष्कळ मुलं होतील माझ्या बबीला! पण काय ग, तुला मुलगे झालेले आवडतील, का मुली? मुली? मुली, नको ग बाई, कारट्यांचा मेला तो जंजाळ! एकापेक्षा एक असे मुलगे होतील म्हणावं मुलगे! तसेच गाडी - घोडे, कपडा-लत्ता, कश्या कश्श्याला म्हणून काही कमी पडायचं नाही! बरं बरं! इतक्यातच नको काही चढून जायला! मोठा दिमाख दाखवते आहे मला! पहा, पहा! कशी फुगते आहे पहा कशी! पण कार्टे बोलू नकोस माझ्याशी! की अस्सा हा गालगुच्चा ...... अग बाई! हे ग काय! कसे सोन्यासारखे बोलते आहे अन तू आपली ... नाय नाय ... उगी उगी माझी बाय ती! ...

**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | |
|---|---|---|
| चिंगी | - | लहान मुलीला लाडाने बोलाविण्याचे नाव |
| सरी | - | तारेत गुंफलेला सोन्याचा दागिना |
| बिंदल्या | - | लहान बाळाच्या हातातला पाटलीसारखा सोन्याचा दागिना |
| वाळे | - | पायात घालण्याचा चांदीचा दागिना |
| साखळ्या | - | लहान बाळाच्या पायात घालायचा दागिना |
| परकर पोलके | - | मुलींचा पोषाख पेहराव |
| छोनी | - | बोबड्या बोलीतील सोनी |
| सोने | - | लाडाने लहान मुलीला बोलावणे |
| नक्षत्र | - | तारका (चांदणी) |
| चित्रासारखा | - | सुंदर देखणा |
| थाट | - | रुबाब, ऐट, डौल |
| ठुकमत | - | नखऱ्याने चालणे |
| लगीन | - | विवाह |
| हुंडा | - | वरदक्षिणा |
| चौघडा | - | सनईच्या साथीला वाजवले जाणारे चर्म वाद्य |
| बेंडबाज्या | - | वाद्यांचा समूह |
| नळे चंद्रज्योती, झाडे | - | शोभेच्या (उडवायच्या) दारूचे प्रकार |
| लकलकाट | - | शोभेच्या दारूचा प्रकाश |
| दैव | - | नशीब |
| कारटी | - | लहान मुलं, मुली |
| जंजाळ | - | कटकट, त्रास |
| गालगुच्चा | - | प्रेमाने गालाला घेतलेला चिमटा |

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**टीप :-**

नाट्यछटा - हा साहित्यप्रकार दिवाकरांनी मराठीत प्रथम आणला. नाट्यछटेत एकच पात्र असते. नाटकाप्रमाणे पात्रे अधिक नसतात. नाट्यछटेत एकच पात्र ते कधी मनाशी बोलते तर कधी ते इतरांशी बोलते. ऐकणारे या पात्रांच्या प्रश्नांना उत्तरे देतात असे समजून हे पात्र आपले बोलणे पुढे चालू ठेवते.

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1. चिंगी रंगाने कशी आहे?
2. चिंगी कसली बुकं वाचील?
3. चिंगीची आई किती हुंडा देणार आहे?
4. मोठी दैवाची कोण आहे?
5. कोणाचा जंजाळ नको आहे?

**प्र2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा.**

1. चिंगीची आई चिंगीला कोणते दागिने करायचे असे म्हणते?
2. चिंगीला कसा नवरा मिळणार आहे?
3. चिंगीच्या लग्नाची वरात कशी निघणार आहे?
4. चिंगीला मुलेच व्हावीत असे चिंगीच्या आईला का वाटते?
5. चिंगी रडू का लागते?

**प्र3. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी चार ते पाच वाक्यात लिहा.**

1. चिंगीची आई चिंगीचे लग्न कशाप्रकारे करणार आहे?
2. चिंगीचा संसार कसा व्हावा असे तिच्या आईला वाटते?

**प्र4. खालील प्रश्नाचे उत्तर सात ते आठ वाक्यात लिहा.**

1. चिंगी एक महिन्याची झाली नाही तोंच तिची आई मनाशी काय काय ठरवते?

**प्र5. खालील वाक्यांचे संदर्भासहीत स्पष्टीकरण करा.**

1. 'शहाणी होईल बबी माझी'
2. 'माणसाला कसं मुठीत ठेवायला हवे बरं का!'
3. 'नाय नाय .... उगी, उगी माझी बाय ती!'

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र6. खालील विधानांना प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत योग्य उत्तर निवडून लिहा.**

1. चिंगी रंगाने कशी आहे?
   अ. सावळी    ब. गोरी    क. काळी    ड. केतकी
2. शंकर काशिनाथ गर्गे यांचे टोपणनाव कोणते?
   अ. माधवानुज    ब. केशवकुमार    क. दिवाकर    ड. बालकवी
3. चिंगीची आई चिंगीच्या लग्नात किती हुंडा देणार आहे?
   अ. हजार    ब. लाख    क. पाचशे    ड. शंभर
4. चिंगीला कशासारखा नवरा मिळणार आहे?
   अ. राजपुत्र    ब. नट    क. नक्षत्र    ड. चंद्र
5. चिंगी महिन्याची झाली नाही तोच या पाठाचा साहित्यप्रकार कोणता आहे?
   अ. नाट्यछटा    ब. नाटक    क. एकांकिका    ड. प्रहसन

**भाषाभ्यास**

**1. खालील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

i. दैवाची असणे
ii. मुठीत ठेवणे

**2. खालील वाक्यातील अलंकार ओळखा.**

माझ्या छबीला नक्षत्रासारखा अगदी चित्रासारखा नवरा मिळेल.

**3. उपक्रम -**

i. दिवाकरांनी लिहिलेली 'बोलावणे आल्याशिवाय येणार नाही.''
   ही नाट्यछटा मिळवून वाचा.
ii. शाळेच्या स्नेहसंमेलनात सदर नाट्यछटा बसवून सादर करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 7. तिथे !

V7F3X9

- **गणेश हरी पाटील**

**परिचय :-**

गणेश हरी पाटील (1906 ते 1989) बी.ए.बी.टी. पर्यंत शिक्षण झाले होते. शाळेत शिक्षक, शिक्षणाधिकारी, ट्रेनिंग कॉलेजचे प्राचार्य अशी विविध पदे त्यांनी भूषविली. ग्रामीण कविता व बालकविता हे त्यांचे विशेष लेखन होते. बालकवितांबद्दल त्यांना अनेक पारितोषिके मिळाली आहेत. निसर्ग वर्णन, संवाद, गेयता, नाट्य यांचा संगम त्यांच्या कवितेत आढळतो. त्यांचे रानजाई, पाखरांची शाळा, लिंबोळ्या हे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत.

वरील कविता 'कविता विसाव्या शतकाची' या संपादित काव्य-संग्रहातून निवडली असून त्याचे संपादन शांता ज. शेळके व सहकाऱ्यांनी केले आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

फुलतात वल्लरी रानजाईच्या तिथे
दरवळे गंध त्यामुळे भान हरपते
चहुबाजू टेकड्या खालाटित पाझरे
सानुली झरी, तिथे चिवचिवती पाखरे



वाऱ्यावर डुलती सोनवळिची फुले
वाजविती तरवड - बाळे निज खुळखुळे
चिमुकली झेंडूची बहीण मखमल डुले
गोकर्ण आपुली झुलवि निळी कुंडले

काटेरी वेड्या रुक्ष तिथे बाभळी
ज्यावरी घरकुले न्हाव्यांची लटकली
करडांसह तेथे बागडती शेरड्या
कलकलाट करती झाडांवर भोरड्या

आसपास बेटे निवडुंगीची तिथे
घायपात भोंती समशेरी रोखिते
शेजारून गेल्या अरुंद पांदीतूनी
रहदारी चाले बाजाराच्या दिनी

झाडीत तेथल्या शिरल्यावर वाटते
राहतो जादुच्या अद्भुत बेटामध्ये
मज बालपणी जी मौज तिथे वाटली
तीच ती आजही अनुभवितो त्या स्थळी

मी कितीक स्थित्यंतरे जगी पाहिली
तीच ती स्थिती नांदते मात्र त्या स्थळी
अधिकांश याहुनी असतील रम्य स्थळे
स्वाभाविक परि मज आकर्षण तेथले

**शब्दार्थ आणि टीपा :-**

वल्लरी - वेल. ही झाडाच्या आधाराने वाढते
रानजाई - रानातील पांढऱ्या रंगांची फुले
दरवळ गंध - पसरलेला सुवास
भान - जाणीव
खालाटित - दोन डोंगरामधील खोलगट जागा.
पाझरे - ठिबकणे / बारीक वाहणे.
सानुली - लहान चिमुकली
तरवड - रानातील पिवळ्या रंगाची फुले असणारे झुडूप
बाळे - तरवडीच्या शेंगा (वाळलेल्या)
निज - स्वतः
खुळखुळे - खुळखुळ आवाज करणारी खेळणी / इथे तरवडाच्या वाळलेल्या शेंगा.
मखमल - सुपारी, झेंडूची फुले
करडं - शेळीचे पिल्लू
शेरडं - शेळी

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | |
|---|---|---|
| बेटे | - | झुडूपांचा समूह |
| निवडुंग | - | काटेरी झुडूप |
| घायपात | - | काटेरी तंतुमय वनस्पती |
| भोंती | - | भोवती |
| पांदी | - | झुडुपातून जाणारी गाडीवाट |
| अद्‌भुत | - | आश्चर्यकारक |
| रहदारी | - | वर्दळ |
| मौज | - | गंमत |
| स्थित्यंतर | - | बदल |
| लुब्धकरणे | - | मोहीत करणे / आकर्षित करणे. |
| अधिकांश | - | पुष्कळदा |
| स्थळ | - | ठिकाण |
| रम्य | - | आनंददायक, मनोहर |
| स्वाभाविक | - | नैसर्गिक |
| झाडी | - | झाडांची दाटी |
| बेट | - | काटेरी झाडांचा समूह |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**टीपा -**

1) खुळखुळे - तरवडीला शेंगा लागतात त्या वाळल्या की खुळखुळ आवाज करतात.

2) मखमलीची फुले - जांभळ्या रंगाची फुले, त्याच्या पाकळ्या मखमल कापडासारख्या मऊ असतात.

3) गोकर्ण - वेलीवर लागणारी गाईच्या कानाच्या आकाराची गडद निळ्या रंगाची फुले ती लोंबत्या कर्णफुलांप्रमाणे वाटतात.

4) न्हाव्यांची घरकुले - बाभळीच्या काट्यांचा वापर करून ओल्या जमिनीत गोलाकार घरटे तयार करतात. त्यात राहणारा काळ्या रंगाचा किडा त्याला न्हावी म्हणतात.

5) समशेरी - घायपाताची पाने लांबसडक निमुळती असतात म्हणून त्याला तलवार (समशेर) म्हटले आहे.

6) भोरडी - काळ्या रंगाचा स्थलांतरीत पक्षी. साळुंकी एवढा असतो. त्याची पाठ काळी व खालच्या बाजूस गुलाबी रंग असतो.

# स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1. कवीचे भान केव्हा हरपते?
2. झरा कोठून वाहतो?
3. वाऱ्यावर कोणती फुले डुलतात?
4. निळी कुंडले असे कोणास म्हटले आहे?
5. झाडांवर कलकलाट कोण करतात?
6. पांदीतून रहदारी केव्हा चालते?
7. समशेरी कोणी रोखल्या?

**प्र2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1. तरवडीच्या खुळखुळ्याचे वर्णन कवीने कसे केले आहे?
2. बाभळीच्या झाडाजवळ कोणकोण आहेत?
3. निवडुंगाच्या बेटाजवळ कोणते दृष्य दिसते?
4. झाडीत शिरल्यावर कवीला काय वाटते?
5. कवीला कोणते आकर्षण वाटते?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**प्र3. खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यात लिहा.**

1. रानजाईपाशी कोणते दृष्य दिसते?
2. आज कवी तेथे कोणती मौज अनुभवतो आहे?
3. कवीला 'त्या' ठिकाणाचे आकर्षण का वाटते?

**प्र4. खालील प्रश्नांची उत्तरे सात ते आठ वाक्यात लिहा.**

1. 'त्या' ठिकाणी गेल्यानंतर कवी निसर्गातील कोणकोणती मौज अनुभवतो?
2. कवीने कोणकोणत्या फुलांचे पक्षांचे वर्णन या कवितेत केले आहे?

**प्र5. संदर्भासहीत स्पष्टीकरण करा.**

1. 'दरवळे गंध त्यामुळे भान हरपते'!
2. ''काटेरी वेड्या रुक्ष तिथे बाभळी''
3. ''मी कितीक स्थित्यंतरे जगी पाहिली''

**प्र6. खालील विधानांना प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत योग्य उत्तर निवडून पुढे लिहा.**

1. वाऱ्यावर डुलती ............. ची फुले

   अ. कोरांटी  ब. गुलबाक्षी  क. जाई  ड. सोनावळी

2. झाडावर कलकलाट कोण करते?

   अ. चिमण्या  ब. भोरड्या  क. साळुंक्या  ड. मैना

3. घायपाताला कवीने काय म्हटले आहे?

   अ. समशेर  ब. चाकू  क. चाबूक  ड. बंदूक

4. मी कितीक ................ जगी पाहिली

   अ. दृष्ये  ब. स्थळे  क. स्थित्यंतरे  ड. स्वरुपे

5. झाडीत गेल्यावर कविला कोठे राहिल्याप्रमाणे वाटते?

   अ. गुहेत  ब. अद्भुत बेटात  क. अभयारण्यात  ड. झाडांच्या पांदीत

**भाषाभ्यास :**

**1. संधी विग्रह करा**

1. स्थित्यंतर
2. अधिकांश

**2. 'तिथे' या कवितेतील 'यमक' अलंकाराची उदाहरणे द्या.**

**उपक्रम :**

1. बालकवींची 'श्रावणमास' ही कविता वाचा व त्यातील निसर्गसौंदर्याची उदाहरणे शोधा.
2. संध्याकाळच्या सौंदर्याचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# ८. अतिथी

P3D8I3

**- वा.कृ. चोरघडे**

**परिचय :-**

वामन कृष्णा चोरघडे (1914-1994) नागपूर येथे प्राध्यापक व प्राचार्य म्हणून काम केले. मराठीतील श्रेष्ठ कथाकार. त्यांनी गांधीजींच्या विचारसरणीचा खोलवर अभ्यास केला होता. सुषमा, यौवन, संस्कार हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. तसेच 'साहित्याचे मुलधन' हे लोकगीतांचे विवेचन करणारे पुस्तक आणि लहानमुलांसाठीही विपुल गोष्टी लिहिल्या आहेत. 'अतिथी' ही कथा 'संपूर्ण चोरघडे' या संग्रहातून निवडली आहे.

भारतीय संस्कृती नेहमी कृतज्ञतेचा धडा शिकवते. आपल्याकडे सणांच्या निमित्ताने झाडावेलींची, नागांची जमिनीची पूजा करून आपण कृतज्ञता व्यक्त करतो. असाच हा पैकू आणि त्याची पत्नी आपल्या घरच्या बैल जोडीचे कौतुक करतात, त्यांना ओवाळतात, सजवतात त्यांचा देव म्हणून सत्कार करतात. कसे ते कथेतच वाचू.

*(मूल्य- भूतदया)*

© KTBS
NOT TO BE REPUBLISHED

पोळा म्हणजे आमंत्रण देऊन आपल्या घरी बैलांना अतिथी म्हणून जेवायला बोलाविण्याचा सण! त्या दिवशी बैलांकडून काम करवून घ्यावयाचे नाही. त्याचे काम माणसाने सांभाळावयाचे. त्या कामाने वर्षाभराच्या त्यांच्या कष्टांचा कृतज्ञतेने मोबदला चुकवायचा. मुलाला सांभाळतो तसे त्यांना त्या दिवशी सांभाळावयाचे. एक दिवसाची सबंध सेवा बैलांच्या चरणी वाहून आपले जीवन विशाल भूतदयाप्रेरित करावयाची इच्छा असा हा पोळ्याचा दिवस. कृषिदेवतेची आज्ञा पाळावयाचा हा दिवस!

त्यातल्या त्यात गेले आठ महिने खपून पैकूचे शेत ज्या लाल्या ढवळ्यांच्या जीवावर उभविले गेले त्याबद्दल पैकूच्या मनात केवढी कृतज्ञता भरली असेल! तिचा प्रत्यय त्याने उठताक्षणीच बैलांच्या अंगावरून जो हात फिरवला त्यातून त्या मुक्या जनावरांनाही आला. त्यानंतर पैकूने आपल्या हाताखालून मोठ्या झालेल्या घरच्या गाईच्या दोन जोड्या काढल्या व त्या सहाही जनावरांना घेऊन तो नदीवर गेला.

डोहामध्ये त्याने बैल सोडले आणि आपले वय विसरून धडाम्‌दिशी पाण्यात उडी मारली. बैलांच्या सर्वांगावर हात फिरवून चोळून चोळून त्यांना अगदी स्वच्छ केले. बाहेर काढून त्यांचे अंग काठावर ठेवलेल्या कोरड्या उपरण्याने पुसून काढले. शेपटीचे गोंडे हातावर ठोकून कोरडे केले आणि ओलेत्याने तो घराकडे परतला. परततांना हिरव्यागार शेताकडे पाहून बैलांनी असा हंबार केला की, आजचा आमचा पारण्याचा दिवस आम्ही समजलो हेच जणू त्यातून स्पष्टतः व्यक्त झाले.

तेवढ्यात पैकूचा मुलगा गेरूचे भांडे घेऊन बाहेर आला आणि गेरूच्या पाण्यात आपले चिमुकले हात बुडवून त्याने बैलांच्या पाठीवर पंजे मारले. पैकूने त्यात गाडगे बुडवून त्याच्या गोल तोंडाने बैलांच्या अंगावर गोल ठिपके दिले नंतर त्याने बैलांची शिंगे लाल करून त्यावर निळ्या चंदेरी बेगडाच्या गोल गोल पट्ट्या चिकटवल्या.

तिसरा प्रहर टळला तेव्हा वडे-पुरणाने भरलेल्या पत्रावळी टोपल्यात भरून त्याने आपल्या बैलांना अं हं लाल्या, ढवळ्यांना जेवू घातले.

नंतर पोळ्याच्या तोरणात उभे करायला म्हणून त्याने बैल नदीच्या वाळवंटाकडे नेले.

तेथे पाटलांच्या, गावच्या मानकऱ्यांच्या झूल घातलेल्या शिंगाना पेटत्या मशाली लावलेल्या धष्टपुष्ट सकस सुंदर सजलेल्या, तूप कणीक खाऊन सौष्ठव कमावलेल्या मस्त बैलांच्या सुरंगी जोड्या शेपट्या उंच करीत आपले कासरे सांभाळणाऱ्यांना हैराण करत होत्या.

तोरणातून जोडी घेऊन पैकू घरी आला. बैलांना घरी दावणीला बांधल्यावर बायजेने त्यांची पूजा केली. दिवसभराचा उपास त्या तीन माणसांच्या कुटुंबाने एका ताटात जेऊन सोडला आणि चार पानांचा विडा खाऊन पैकू आपली बैलजोडी घेऊन मिरवायला ओळखीच्या घरांकडे निघाला. पाटील, मानकरी, ब्राह्मण सर्वांच्या घरी जाऊन आला. प्रत्येकाच्या घरी बैलांच्या कपाळी कुंकवाचा टिळा आणि पायावर फुले पडली. पैकूच्या हातावर गुळाचा खडा, कानावर गोड शब्द आणि मुलाच्या हातावर अनुकूल असे द्रव्य पडले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



बैलजोडी डॉक्टरांच्या घरी जाऊन उभी राहिली पाटलांच्या घरामुळे येथेही पैकूची ओळख होतीच. त्याने त्यांच्या दारात पूजेला बैलजोडी आणली होती. डॉक्टर बाहेर गेले होते. पैकूने डॉक्टरीणताईंना हाक मारली -

''बाई दारी देव आणले आहेत पूजा करा''

''कसली रे पैकू? कोणते देव? बाईनी बाहेर येऊन विचारले. केसांचा आंबाडा बांधीतच त्या बाहेर आल्या.

''कसली पूजा करायची रे? या बैलांची?''

''हो जी''

''कशाला रे ही पूजा त्या जनावरांना त्यात काही कळतं तरी?''

''अशिक्षितांचे हे खेळ आणि या समजुती. आम्हाला यात विश्वास नाही. पूजा बिजा काय करायची? तू आमच्याकडे आलास तुला आम्ही ओळखतो हे घे तुझं इनाम!'' असे म्हणून पोटी खोचलेला एक रुपयाचा कागदाचा चिटोरा त्यांनी पैकूच्या हातावर ठेवला आणि ''डॉक्टर घरी नाहीत'' असे सांगून त्या आत गेल्या.

..............

बायजा पंधरा सोळा तासांच्या श्रमांनी दमून मुलाला पोटाशी घेऊन आडवी झाली होती तेव्हा पैकू म्हणाला ''बजे आज इतक्या लवकर झोपायला या चोवीस घंट्यात म्हातारी झालीस होय?''

''किती कमाई आणली आज? काय दिलं कुणी कुणी?''

पैकूने सगळे सांगितले, कुणी काय दिले याचा हिशेब केला.

''आणि हे पहा''

''काय?''

''डॉक्टरणीनं पूजाच केली नाही लाल्या-ढवळ्यांची''

''म्हणजे?''

''म्हणाली, ती जनावरं त्यांची काय पूजा करायची? आम्ही तुला ओळखतो.''

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

‘‘मग तुम्ही निघून नाही आलात?’’

‘‘मग तिन एक रुपयाचा कागद दिला’’

‘‘बैलांची पूजा केली नाही आणि चिटोरं दिलं’’? - बायजाने रागाने विचारलं.

ती म्हणाली, ‘‘लाल्या-ढवळ्या आज आपल्या घरचे पाव्हणे. ती काही आज जनावर नव्हती. त्या बाईनं अपमान केला त्यांचा. हा गोडपणा नव्हे कुठाय तो कागद? ते जहर आहे आपल्याला. त्याचा पैसा होणार नाही कधी!’’

पैकू उठला अंगणातील तेलवात त्याने आणली. आंगड्यातला सबंध एक रुपयाचा सोळा आणे किंमतीचा कागद सरळ त्या तेलवातीवर धरला.

सदऱ्यात शिरलेला ढेकूण पकडून काढून टाकल्यावर गार वाऱ्याच्या झुळकीने जशी सुखावून झोप लागावी तसे त्याला झाले.

‘‘पैकू आज मारबत नाही ओरडलास? कर सुरू झाली असेल. ‘‘ओरड,’’ ‘‘मग आपण झोपू!’’ पैकूने उठून बसत उच्चारले माशा, मुरकुट्या, खरूज खोकला, मानअपमान घेउन जा... रे मारबत!

घेउन जा...रे मारबत! घेउन जा...रे मारबत!’’

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | |
|---|---|---|
| दरवर्षी | - | प्रत्येक वर्षी |
| अतिथी | - | पाहुणा |
| कोड कौतुक | - | लाड, माया |
| कृतज्ञता | - | केलेले उपकार जाणणे |
| भूतदया | - | प्राण्यांवरील प्रेम |
| प्रेरित | - | स्फूर्ती मिळालेला |
| कृषिदेवता | - | शेतीची देवता |
| गेरू | - | काव (लाल रंगाची माती) |
| हंबार | - | जनावरांचे (बैल) ओरडणे |
| पारणे | - | उपवासाच्या समाप्तीचा दिवस, गोड खाण्याचा दिवस. |
| पंजा | - | तळहात |

| | | |
|---|---|---|
| प्रहर | - | तीन तासांचा कालावधी |
| वडे | - | मिश्र पिठांचा तळलेला पदार्थ |
| पुरण | - | हरबऱ्याच्या डाळीत (शिजवून) गूळ घालून केलेला पदार्थ |
| मानकरी | - | गावातील कार्यक्रमात विशिष्ट मान किंवा हक्क मिळालेल्या व्यक्ती |
| झूल | - | बैलांच्या पाठीवर घालावयाचे रंगीत गोंडेदार वस्त्र |
| धष्टपुष्ट | - | सुदृढ |
| सकस | - | कसदार (प्रथिनेयुक्त आहार) |
| सौष्ठव | - | शरीराची आकर्षक रचना, घोटीव शरीर |
| मस्त | - | सुंदर |
| सुरंगी | - | सुंदर रंगांनी रंगवलेल्या |
| कासरा | - | बैलांचे नियंत्रण करणारी दोरी |
| हैराण करणे | - | त्रास देणे |
| तोरण | - | पाने फुलांनी गुंफलेली दोरीवर बांधायची शुभसूचक माळ |
| अनुकूल | - | योग्य |
| द्रव्य | - | पैसा |
| अंबाडा | - | केसांची (गोल) विशिष्ट प्रकारची रचना |
| अशिक्षित | - | न शिकलेला |
| अंधश्रद्धा | - | विचार न करता ठेवलेली श्रद्धा |
| इनाम | - | बक्षीस |
| चिटोरा | - | कागदाचा तुकडा |
| कमाई | - | मिळकत |
| जहर | - | विष |
| आंगडा/मुंडा | - | बिन बाह्यांचा खिसा असलेला बनियन |
| तेलवात | - | दिवा |
| कर | - | पौर्णिमा व आमावस्येनंतर येणारा दिवस |
| माशा मुरकुट्या | - | माशा, डास, चिलटं इ. |
| डोह | - | भरपूर खोली असलेली नदीच्या पात्रातील जागा. |

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**टीपा -**

बैलपोळा - ज्येष्ठ किंवा आषाढ पौर्णिमेला शेतकरी बैलांना काम लावीत नाहीत. त्यांना आंघोळ घालून रंगाने रंगवून सजवितात. त्यांची पूजा करतात. त्यांना ओवाळतात, गावातून मिरवतात, व पुरणपोळी त्यांना खाऊ घालतात. वर्षभर बैलांनी केलेल्या श्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस! कर्नाटकात या सणाला कारहुण्णीवे किंवा कारवणी म्हणतात.

मारबत - परसातील रोगराई नष्ट करणारी देवता. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी ह्या देवतेची मिरवणूक काढतात. हिच्याकडे रोगराई इडापिडा घालविण्यासाठी मागणं मागतात त्याला मारबत ओरडा म्हणतात.

## स्वाध्याय

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**प्र1. खालील प्रश्नाचे उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1. बैलांच्या कोडकौतुकाचा दिवस कोणता?
2. पोळा या सणाच्या दिवशी बैलांना काय म्हणून बोलवतात?
3. बैलांच्या पाठीवर पंजे कोणी मारले?
4. पैकूने आपली बैलजोडी प्रथम कोणाकडे नेली?
5. बैलांना जेवू घालण्यासाठी कोणते पदार्थ केले होते?
6. इनाम म्हणून डॉक्टरीणबाईनी काय दिले?
7. कर सुरू झाल्यावर पैकूच्या ओरडण्याला काय म्हणतात?

**प्र2. खालील प्रश्नाचे उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा.**

1. पैकूने आपल्या बैलांना कसे स्वच्छ करून सजविले?
2. तोरणाखाली कोणकोणत्या बैलजोड्या आल्या होत्या?
3. आपली बैलजोडी घेऊन मिरवायला गेलेल्या पैकूला इनाम म्हणून काय काय मिळाले?

4. बायजाने पैकूला कमाईबद्दल विचारल्यानंतर पैकूने काय सांगितले?

5. डॉक्टरीणबाईनी इनामाचा एक रुपाया दिल्यानंतर पैकूला काय वाटले?

**प्र3. खालील प्रश्नांची उत्तरे चार-पाच वाक्यात लिहा.**

1. पैकूने बैलांविषयी कृतज्ञता कशी दाखविली?

2. बायजाने एक रुपायाच्या नोटेला जहर का म्हटले आहे?

3. पैकूने मारबत म्हणून काय ओरडा केला?

**प्र4. खालील प्रश्नांची उत्तरे सात-आठ वाक्यात लिहा.**

1. पैकूने आपल्या अतिथींचा सत्कार कसा केला?

2. डॉक्टरीणबाईकडे गेल्यावर काय घडले? त्यानंतर बायजेने काय केले? का?

**प्र5. खालील वाक्यांचे संदर्भासहीत स्पष्टीकरण करा.**

1. ''बाई देव आणले आहेत पूजा करा!''

2. ''किती कमाई आणली आज? काय दिलं कुणी कुणी?''

3. ''कसली पूजा करायची रे? या बैलांची?''

4. ''पैकू! आज मारबत नाही ओरडलास?''

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**प्र6. खालील प्रश्नाचे प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत योग्य निवडून पुढे लिहा :-**

1. बैलांना सन्मानाने आमंत्रण देऊन त्यांचे कोडकौतुक करण्याचा दिवस कोणता?

   अ. दिवाळी  ब. दसरा  क. पोळा  ड. नागपंचमी

2. लाल्या-ढवळ्या ही नावे कोणाची आहेत?

   अ. मित्रांची  ब. बैलांची  क. मुलांची  ड. कुत्र्यांची

3. पैकूचा मुलगा कोणते भांडे घेऊन बाहेर आला?

   अ. चहाचे  ब. दुधाचे  क. गेरूचे  ड. पाण्याचे

4. पैकू अखेरीस बैलजोडी घेऊन कोणाकडे गेला?

अ. डॉक्टर ब. वकील क. पाटील ड. गुरव

5. पैकू आज .................. नाही ओरडलास?

अ. चांगभल ब. मारबत क. जयभवानी ड. उदो उदो.

**भाषाभ्यास :-**

**प्र1. खालील ओळीतील अलंकार ओळखा.**

1. मुलाला सांभाळतो तसे त्या बैलांना सांभाळायचे!
2. सदऱ्यात शिरलेला ढेकूण पकडून काढून टाकल्यावर गार वाऱ्याच्या झुळकीने जशी सुखावून झोप लागते तसे त्याला झाले!

**प्र2. अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

1. आडवे होणे.
2. मोबदला चुकवणे.

**उपक्रम :-**

1. म. ना. अदवंत यांनी लिहिलेली 'माणुसकीचा गहिवर' ही कथा मिळवून वाचा.
2. चारुता सागर यांनी लिहिलेली 'नागीण' ही कथा मिळवून वाचा.

❉❉❖❉❖❖❉❖❉

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 9. दीप लाव तो

G5X3Z4

**- कुसुमाग्रज**

**कवी परिचय :-**

विष्णू वामन शिरवाडकर (1912 ते 1999) मराठीतील ज्येष्ठ कवी, नाटककार, कादंबरीकार व ललित-लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. 27, फेब्रुवारी मराठी भाषा दिन हा त्यांचा जन्मदिन. हा दिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो त्यांनी जीवनलहरी, किनारा, मराठी माती, स्वगत, हिमरेषा, वादळवेल, प्रवासी पक्षी, मुक्तायन हे काव्यसंग्रह; दूरचे दिवे, कौंतेय, ययाती आणि देवयानी, वीज म्हणाली धरतीला, नटसम्राट ही नाटके तसेच वैष्णवी, जान्हवी, कल्पनेच्या तीरावर या कादंबऱ्या; आणि आहे आणि नाही, प्रतिसाद हे ललितलेखसंग्रह लिहिले आहेत. 1964 साली मडगाव (गोवा) येथे भरलेल्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद यांनी भूषविले होते. तसेच पहिल्या जागतिक मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. 1988 साली त्यांना 'ज्ञानपीठ' हा भारतातील सर्वोच्च पुरस्कार मिळाला.

ही कविता 'मराठी माती' या काव्यसंग्रहातून निवडली आहे. - परमेश्वराकडून माणसाला पराक्रम, शास्त्र, वैभव मिळाले तरी माणसाला खऱ्या आनंदाचा स्वर्ग दिसलाच नाही. म्हणून तो माणूस पुन्हा परमेश्वराला शरण जातो. तेव्हा देव त्याला अंतःकरणातील माणुसकीचा दिवा लाव म्हणजे तुला स्वर्गानंद मिळेल असे सांगतो. माणसाने माणसाबरोबर प्रेमाने वागावे हाच संदेश ही कविता देत आहे. या कवितेचा प्रकार मुक्त छंद आहे.

*(मूल्य - माणुसकी, आशा)*

© KTBS
NOT TO BE REPUBLISHED



प्रसन्न झाला देव मानवा
म्हणे माग तुज काय हवे ते
'शस्त्र हवे मज' माणूस वदला
''साध्य सर्व हो पराक्रमाने''



शस्त्र मिळाले हो समरांगण
अवघ्या भू चे हृदय विदारी
माखुनिया रक्तात राहिला
पुन्हा उभा देवाच्या दारी



'काय हवे तुज?' शस्त्र न पुरते
करील शास्त्रच मंगल जीवन
ज्ञानसाधनी ये ईश्वरता
स्वर्ग धरेचे करीन मीलन!

शास्त्र मिळाले, शस्त्र मिळाले
स्वर्ग परी स्वप्नातच राही
हतबल आणिक हताश मानव
पुन्हा प्रभूच्या सन्निध येई





'काय हवे तुज? बावरलो मी
वाट दिसेना, या तिमिरातून
देव म्हणे - 'तुजजवळिच आहे
दीप लावतो, तव माणुसपण!

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शस्त्र | - | हत्यार | वदला | - | म्हणाला |
| साध्य | - | शक्य | समरांगण | - | युद्ध भूमी |
| अवघ्या | - | सगळ्या | भू | - | जमीन |
| विदारी | - | जखमी करी | माखुनी | - | अंगाला लावून |
| शास्त्र | - | विज्ञान | मंगलजीवन | - | सुखी आयुष्य |
| ज्ञान साधना | - | ज्ञानाचा अभ्यास | स्वर्ग | - | देवांचे वसतिस्थान (इथे वैभव) |
| मीलन | - | एकत्र येणे | हतबल | - | उपाय न चालणे |
| हताश | - | निराश | सन्निध | - | जवळ |
| बावरलो | - | गोंधळलो | तिमिर | - | अंधार |
| दीप | - | दिवा | तव | - | तुझे |
| माणुसपण | - | माणसाने माणसाशी वागण्याची रीत/दया | | | |

# स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

1. प्रसन्न झालेला देव माणसाला काय म्हणाला?
2. प्रथमतः माणसाने देवाकडे काय मागितले?
3. दुसऱ्यांदा माणसाने देवाकडे काय मागितले?
4. पुन्हा मानव प्रभूच्या दारी का गेला?
5. मानवाजवळ कोणता दिवा आहे असे देव म्हणाला?

**प्र2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा.**

1. शस्त्र मिळाल्यावर मानवाने काय केले?
2. शास्त्र मिळवून मानव काय करणार होता?

**प्र3. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी पाच-सहा वाक्यात लिहा.**

1. शस्त्र, शास्त्र मिळवूनही माणूस हताश का झाला?
2. माणूसपणाचा दिवा लाव म्हणजे काय?

**प्र4. खालील प्रश्नांचे उत्तर सात ते आठ वाक्यात लिहा.**

1. 'दीप लाव तो' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

**प्र5. संदर्भासहीत स्पष्टीकरण करा.**

1. स्वर्ग परी स्वप्नातच राही ..........
2. हतबल आणिक हताश मानव ..........
3. दीप लाव तो तव माणूसपण ..........

**प्र6. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा**

1. ........................ हवे मज माणूस वदला
2. करील शास्त्रच ........................
3. स्वर्ग परी ........................ राही
4. साध्य सर्व हो ........................
5. देव म्हणे ........................ आहे

**भाषाभ्यास :-**

**प्र1. खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा**

1. तिमिर 2. मंगल 3. हताश 4. मानव 5. दीप

**उपक्रम :-**

1. श्री. म. माटे यांनी लिहिलेला 'बढाईखोर माणसा' हा निबंध मिळवून वाचा.
2. विश्वास पाटील यांनी लिहिलेली 'पानिपत' ही कादंबरी मिळवून वाचा.

********

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 10. रामेश्वरचे दिवस

## (डॉ. अब्दुल कलाम - जन्म 15-10-1931 मृत्यु 27-7-2015)

N9D2M1

**अनुवादिका - प्रा. माधुरी शानभाग**

**परिचय:-**

डॉ. अबुल पाकीर जैनुलाबदीन अब्दुल कलाम म्हणजे भारताचे 11 वे राष्ट्रपती होते. त्यांना पद्मभूषण, पद्मविभूषण व भारतरत्न हे पुरस्कार मिळाले. त्यांना 'मिसाईल मॅन ऑफ इंडिया' असे संबोधले जाते. 1989 मध्ये त्यांच्या पुढाकाराने भारतातर्फे अग्निप्रक्षेपकाचे उड्डाण यशस्वीरित्या पार पडले. 1982 साली मद्रासच्या अण्णा विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट पदवी बहाल केली. बुद्धिवादी, निष्कलंक, निःस्वार्थी असलेले डॉ. कलाम हे 'लोकांचे राष्ट्रपती' म्हणून नावारुपास आले.

प्रस्तुत लेख डॉ. कलाम यांच्या 'विंग्ज ऑफ फायर' या आत्मकथनातून घेतला आहे. ह्या आत्मकथनाचा अनुवाद प्रा. माधुरी शानभाग यानी 'अग्निपंख' या नावाने केला आहे.

प्रा. माधुरी शानभाग ह्या प्रसिद्ध विज्ञान कथाकार, अनुवादकार व कादंबरीकार आहेत. मुलांसाठी असलेल्या विज्ञान विषयक चळवळींमध्ये त्यांचा मोठा सहभाग आहे. त्यांनी भारतरत्न सी. एन. आर. राव यांच्या वरील 'अनोख्या रसायनाने बनलेला माणूस' हे चरित्र, नोबेल पुरस्कार विजेते चंद्रशेखर सुब्रमण्यम यांचे चरित्र व रिचर्ड सेनमन यांच्यावरील चरित्राचा अनुवाद, तसेच लेटर्स डू अ यंग सायंटिस्ट इत्यादी पुस्तके लिहिली आहेत. त्यांना त्यांच्या लेखनाबद्दल अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

प्रा. शानभाग यांनी बेळगाव येथील गोविंदराम सक्सेरिया विज्ञान महाविद्यालयामध्ये भौतिकशास्त्राच्या प्राध्यापिका म्हणून कार्य केले. पुढे प्राचार्या म्हणून तेथून त्या निवृत्त झाल्या आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

मद्रास राज्यातील रामेश्वरम या छोटया बेटासारख्या गावात, एका मध्यमवर्गीय तामिळ कुटुंबात माझा जन्म झाला. माझे वडील जैनुलाबदीन यांच्यापाशी ना फारशी संपत्ती होती, ना शिक्षण, पण या उणिवांवर मात करेल असे आंतरिक शहाणपण त्यांना लाभलेले होते. माझ्या आईचा उदार, विशाल असा दृष्टीकोन होता. तिच्या हातून रोज कितीजणांच्या पोटी अन्न जायचे हे मी सांगू शकणार नाही, पण आमच्या पंक्तीला कुटुंबातील माणसांपेक्षा बाहेरची माणसे अधिक संख्येने असायची. आजूबाजूच्या लोकांमध्ये एक आदर्श जोडपे असे त्यांचे वर्णन केले जाई. वडिलांपेक्षा माझ्या आईचे कूळ अधिक उच्च मानले जात असे, कारण तिच्या पूर्वजांपैकी कुणाला तरी ब्रिटिशांकडून बहादूर अशी पदवी मिळालेली होती.

मी सामान्य रूपाचा, लहान चणीचा. अनेक भावडांपैकी एक होतो. माझे आईवडील दोघेही उंच, देखणे होते एकोणिसाव्या शतकात बांधलेल्या पिढीजात घरात आमचे वास्तव्य होते. विटा, चुनखडीने बांधलेले ते पक्कया बांधणीचे घर रामेश्वरम्ची मशीद असलेल्या रस्त्यावर होते. घर तसे मोठे ही होते. माझे वडील साध्या राहणीचे भोक्ते होते. चैनीच्या, महागडया वस्तू कधी आमच्या घरी येत नसत. पण आवश्यक गरजा व्यवस्थित पुरवल्या जात. कपडे, अन्न, औषधपाणी या बाबतीत कुणालाही त्यानी कधी कमी पडू दिले नाही. माझे बालपण भावनिक, सांपत्तिकदृष्ट्या अगदी सुरक्षित, सुखाचे गेले, असेच मी म्हणेन.

मी नेहमी माझ्या आईबरोबर स्वयंपाकघरात फरशीवर बसून जेवत असे. माझ्यासमोर केळीचे हिरवेगार पान ठेवून त्यावर अगदी प्रेमाने ती भाताचा ढीग वाढत असे. वरती मसाल्याच्या वासाने घमघमणारे सांबार असायच. एका बाजूला तोंडाला पाणी सुटेल अशी चमचमीत, घरगुती लोणची असायची, तर दुसऱ्या बाजूला खोबऱ्याचा स्वादिष्ट चटणीचा गोळा असायचा.

रामेश्वरातील ऐतिहासिक, पवित्र शिवमंदिर आमच्या घरापासून चालत गेले तर दहा मि निटांच्या अंतरावर होते. आमच्या घराच्या आजूबाजूची वस्ती प्रामुख्याने मुसलमान असली; तरी काही हिंदू कुटुंबेही होती. मुसलमान शेजाऱ्यांशी त्यांचे गुण्यागोविंदाने वागणे-बोलणे होते. आम च्या वस्तीत एक जुनी मशीद होती. तिथ मी रोज वडिलांबरोबर संध्याकाळचा नमाज पडण्यासाठी जात असे. माझे वडील प्रार्थना संपवून मशिदीबाहेर आले, की अनेक धर्माचे, वेगवेगळे आर्थिक स्तरावरचे लोक त्यांची वाट पहात थांबलेले असत. त्यांच्या हातात पाण्याची छोटी छोटी भांडी असत वडील त्या पाण्यात बोटे बुडवून प्रार्थना करत ते पाणी मग लोक श्रद्धेने घरी नेत, औषधपाणी म्हणून आजाऱ्यांना देत. मला हेही आठवते, की आजार बरा झाल्यावर लोक घरी येऊन वडिलांचे आभार मानत. तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर एक समाधानी, आनंदी स्मित उमटे आणि ते म्हणत, त्या दयाळू, कृपाळू अल्लाचे आभार माना.

रामेश्वरमच्या शिवमंदिराचे प्रमुख पुजारी पं. लक्ष्मण शास्त्री आणि माझे वडील एकमेकांचे चांगले मित्र होते. माझ्या लहानपणाचे एक चित्र स्पष्टपणे माझ्या मनःपटलावर उमटलेले आहे. पारंपरिक मुसलमान पोषाखात माझे वडील अनू धोतर-पंचा-उपरणे अशा हिंदू वेषातील शास्त्रीजी - असे दोघे मित्र देवी कृपा, अध्यात्म, तत्वज्ञान अशा गंभीर विषयांवर मनःपूर्वक चर्चा करत आहेत.

मी मोठा झालो प्रश्न विचारण्याएवढा, समजदार झालो. तेव्हा वडिलांना मी प्रार्थनेतील शब्दांचा अर्थ विचारला उत्तरादाखल ते म्हणाले, प्रार्थनेमध्ये, नम ाज पढण्यामध्ये गुढ असे काही नाही. एकत्र येऊन नमाज पढताना माणसा - माणसातील भेदभाव नाहीसे होतात. संपत्ती, वय, जातधर्म, वंश, शरीर सर्व काही विसरून आपण त्या अगाध दैवी विश्वशक्तीशी एकरूप होतो.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

माझे वडील पहाटे उठून सुर्योदयापूर्वीचा, पहाटेचा नमाज पडायचे. त्यानंतर आमच्या घरापासून चारेक किलोमीटर अंतरावर आमची नारळाची वाडी होती, तिथे ते जात, येताना डझनभर नारळ खांद्यावरून वाहून आणत आणि मगच नाश्ता करत. अगदी सत्तरी गाठेपर्यंत त्यांचा हा रोजचा क्रम कधी चुकला नाही.

मी दहा वर्षाचा होतो, तेव्हा माझ्या वडिलांनी लाकडी नौका बांधायचा व्यवसाय करायचे ठरवले. या प्राचीन तीर्थक्षेत्रावर येणाऱ्या प्रवासी भक्तांना रामेश्वरपासून धनुष्कोडिपर्यंत नेण्या-आणण्यासाठी तिचा उपयोग ते करणार होते. धनुष्कोडिला स्थानिक भाषेत 'सेतुक्करायी' म्हणतात. अहमद जलालुद्दिन नावाच्या एका आमच्याच गावातल्या कंत्राटदाराबरोबर समुद्रकिनारी ते रोज काम करु लागले. पुढे जलालुद्दीन यांनी माझ्या बहिणीशी जोहराशी विवाह केला आणि आमच्याशी नाते जोडले. बोटीला हळूहळू आकार येत असलेला मी रोज पाहत होतो. त्याचा लाकडी नांगर, सुकाणू वगैरे भाग हळूहळू पक्के बनवले जात होते. एक दिवस भयानक चक्रीवादळाने किनाऱ्याला झोडपून काढले. ताशी शंभराहून अधिक मैलांच्या वेगाने वाहणाऱ्या सोसाट्याच्या वाऱ्यांनी सेतुक्करायीची थोडीफार जमीन अन् आमची बोट समुद्रार्पण केली. पंबनचा पुल उतारूंनी भरलेल्या रेल्वेगाडीसकट कोसळून गेला तोपर्यंत मी समुद्राचे फक्त सौंदर्य पाहिले होते. त्या प्रसंगात प्रथमच त्याचे रौद्र रूप, त्याची संहारक शक्ती यांचे मला दर्शन झाले.

त्या बोटीच्या जन्मापासून तिचा विनाश होईपर्यतच्या काळात महंमद जलालुद्दीन माझा धनिष्ट मित्र बनला होता. तसा तो माझ्याहून पंधराएक वर्षांनी मोठा होता. मला तो आझाद म्हणायचा. रोज संध्याकाळी आम्ही लांबवर फिरायला जात होतो. मशिदीसमोरच्या रस्त्यावरून समुद्र किनाऱ्यावरच्या मऊमऊ वाळूकडे आपसूक आमची पावले वळायची. आम्ही अधिकतर आध्यात्मिक, आर्थिक, दैवी, आत्म्याशी संबंधित अशा विषयांवर बोलत असू. रामेश्वर एक तीथक्षेत्र असल्याने अशा प्रकारच्या संभाषणांनी योग्य, भारलेले वातावरण तिथे होते. फक्त जलालुद्दीनचे अल्लाशी काहीतरी विशेष नाते आहे असे मात्र वाटे. तसा तो फारसा शाळेत जाऊ शकला नाही. त्याच्या घरची परिस्थिती बिकट होती. पण त्यामुळे त्याच्यामध्ये अजिबात कडवटपणा आला नव्हता. त्याने मला शिकण्यासाठी सदैव प्रोत्साहन दिले. माझ्या शाळा-कॉलेजातील यशामुळे तो मनोमन सुखावलेला आहे हे मला कळायचे. आपल्या वाट्याला आलेल्या परिस्थितीबद्धल त्याने कधी खंत व्यक्त केलेली मला आठवत नाही. उलट आयुष्याने जे काही आपल्या ओंजळीत टाकले, त्याबद्दल त्याला वाटत असलेली कृतज्ञता त्याच्या वागणुकीतून सहज प्रतीत होत असे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

मला आठवते संपूर्ण रामेश्वर बेटावर इंग्रजी जाणू शकणारा त्या वेळी तो एकटाच माणूस होता. कुणालाही गरज पडेल तेव्हा तो पत्रे लिहून देत असे. अर्ज असूदे किंवा काही सरकारी लिखावट असूदे, जलालुद्दीनचेच नाव पुढे येई. आमच्या खेडेवजा, धार्मिक गावाच्या पलिकडे असलेल्या नव्या जगाची त्याने मला ओळख करून दिली.

त्या लहान गावात माझ्या छोट्या बालपणीच्या जगात पुस्तक म्हणजे एक दुर्मिळ वस्तू होती. आमच्या गावात एस.टी.आर. मणिकम नावाचे एक माजी क्रांतिकारक राष्ट्रभक्त राहत होते. त्यांच्याकडे, पुस्तकांचा बऱ्यापैकी संग्रह होता. त्यानी मला पुस्तके वाचण्यासाठी सदैव उत्तेजन दिले. मीही मिळेल ते वाचत गेलो.

माझ्या बाल्यावस्थेत शमसुद्दीन नावाच्या माझ्या एका दूरच्या भावाचा माझ्यावर बराच प्रभाव होता. रामेश्वर मध्ये येणाऱ्या वर्तमान पत्रांचा तो एकुलता एक वितरक होता. रोज सकाळच्या रेल्वेगाडीने 'पंबन' गावाहून वर्तमान पत्रांचे गठ्ठे येत. गावातील हजारभर सुशिक्षितांच्या वाचनाची गरज भागविणाऱ्या शमसुद्दीनचा तो व्यवसाय होता. स्वातंत्र्याच्या चळवळीची वाटचाल गाववाल्याना समजणे हे महत्वाचे कार्य त्यातून साधत असे. कुणाला भविष्य जाणून घेण्यास, तर कुणी मद्रासच्या बाजारपेठेतले सोन्याचांदीचे भाव समजण्यासाठी उत्सुक असत. थोडेजण जिज्ञासू वृत्तीने हिटलर, म. गांधी आणि बॅरिस्टर जीनांबद्दल गांभिर्याने चर्चा करत. पण झाडून सर्वजणाना पेरियार ई.व्ही रामस्वामी यांच्या हिंदू धर्मातील उच्चवर्णीयांविरुद्ध चाललेल्या चळवळीबद्दल जाणून घेण्यात रस होता. 'दिनमणी' हे त्यावेळचे सर्वात लोकप्रिय तमिळ वर्तमानपत्र होते. छापलेले शब्द त्या वेळी मला वाचायला येत नसत. त्यातील चित्राकडे बघून मी समाधान मानत असे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

चालत्या रेल्वेगाडीतून वर्तमानपत्रांचे गठ्ठे रामेश्वर ते धनुष्कोडी दरम्यान खाली फेकले जात. ते गठ्ठे गोळा करण्यासाठी शमसुद्दीनला कोणीतरी मदतनीस हवा होता. माझ्यापेक्षा दुसरा योग्य उमेदवार त्याला कुठून मिळणार? माझ्या आयुष्यातील पहिली कष्टाची कमाई करायला शम-सुद्दीनचा असा हातभार लागला स्वतःच्या कष्टाने मिळविलेल्या पहिल्या कमाईचा अभिमान आजही माझ्या मनात आहे.

प्रत्येक मुल जन्माला येताना आईवडिलांकडून काही जन्मजात वैशिष्ट्ये घेऊन येते. माझ्या वडिलांकडून मी प्रामाणिकपणा आणि स्वयंशिस्त शिकलो. तर आईने मला चांगल्यावर विश्वास ठेवायची आंतरिक शक्ती दिली. दयाळू वृत्ती दिली. शाळेत शिकायला न मिळणारे उपजत शहाणपण मी जलांलुद्दीनकडून शिकलो. तर शमसुद्दीन कडून मी चेहऱ्यावरून दुसऱ्याच्या मनातले ओळखायला शिकलो, शरीराची डोळ्यांची भाषा शिकलो. माझ्या मध्ये जो सर्जनशीलतेचा स्त्रोत उगम पावत, फुलत, गेला; त्याचे श्रेय मी निःसंशय त्या दोघांच्या सहवासाचा माझ्यावर जो प्रभाव पडला त्याला देतो.

बालपणी माझे तीन जीवश्चकंठश्च मित्र होते. रामनाथशास्त्री, अरविंदन आणि शिवप्रकाशन हे तिघेही हिंदू, उच्चकुलीन, सनातनी ब्राह्मण कुटुंबातले होते. रामेश्वरच्या देवळात दरवर्षी 'सीताराम कल्याणम' उत्सव साजरा होत असे. देवळापासून लग्नमंडपाच्या जागेपर्यंत देवांच्या मूर्ती नेण्यासाठी बोटीची तसेच विशेष मंचकाची व्यवस्था आमचे कुटुंब करत असे. रात्री झोपताना आजीकडून, आईकडून वेगवेगळया संताच्या, पीरांच्या कथा आणि रामायणातील छोटे-छोटे प्रसंग ऐकतच आमच्या घरातील मुले मोठी झाली.

मी पाचवीत असतानाचा एक प्रसंग आहे. त्या वेळी मी रामेश्वरमधल्या प्राथमिक शाळेत शिकत होतो. एक दिवस वर्गावर एक नवे मास्तर आले. मी आणि रामनाथशास्त्री नेहमी एकमेकांशेजारी पहिल्या बाकावर बसत असे. माझ्या डोक्यावर नेहमी मुसलमान धर्माची निर्देशक टोपी असायची आणि त्याच्या गळयात जानवे रूळत असे. त्या नव्या, तरूण मास्तरांना कर्मठ हिंदू ब्राह्मण मुलांने मुसलमानाच्या शेजारी बसणे अस्वस्थ करू लागले. आमच्या सामाजिक पातळीनुसार त्यांनी मला शेवटच्या बाकावर जाऊन बसायला फर्मावले. मला अतिशय वाईट वाटले. रामनाथाच्या चेहऱ्यावरही शरमिंदेपणा उमटला. मी उठून मागच्या बाकावर बसलो, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर उमटलेले दुःख मी वाचू शकलो. त्याचा रडवेला, अश्रूभरला चेहरा माझ्या स्मृतींमध्ये कायमचा कोरून ठेवलेला आहे.

त्या दिवशी शाळा सुटल्यावर आम्ही घरी गेलो अन् आपापल्या आईवडिलांना घडलेला प्रकार सांगितला. लक्ष्मणशास्त्रीनी लगेच त्या मास्तरांना निरोप पाठवून बोलावून घेतले आणि आमच्या उपस्थितीत त्याना सांगून टाकले 'या निष्पाप निरागस मुलांमध्ये सामाजिक विषमतेचे, उच्चनीच्चतेचे विष पेरू नका. भिन्न धर्मीयांमध्ये तेढ उत्पन्न करु नका.' इतकेच नव्हे तर रोखठोकपणे त्यानी त्या मास्तराना माफी तरी मागा किंवा ही शाळा, गाव सोडून जा असे सुनावले.

मास्तरांना आपल्या वागण्याचा पश्चाताप तर झालाच; पण लक्ष्मणशास्त्रींसारख्या देवळाच्या प्रमुख पुजाऱ्याचे ते शब्द त्यामुळे त्यांच्या हातून मुलांच्या बाबतीत असा भेदभाव घडला नाही.

आम्हाला सायन्स शिकवणारे मास्तर श्री. शिवसुब्रमणीया अय्यर हेही एका कर्मठ ब्राह्मण कुटुंबातले होते. त्यांची पत्नी जुने रीतीरिवाज पाळणारी सनातनी वृत्तीची होती. विज्ञानाचा अभ्यास केल्यामुळे असेल, मास्तरांची मते पुरोगामी होती. मी त्यांचा अगदी आवडता विद्यार्थी होतो. मला ते नेहमी म्हणायचे.

कलाम मोठमोठया शहरातील सुशिक्षित लोकांच्या तोडीचा तू व्हायला हवेस. एक दिवस त्यानी मला त्यांच्या घरी जेवायला बोलावले. आपल्या सोवळ्या स्वयंपाकघरात बसून एक मुसलान विद्यार्थी जेवणार, या कल्पनेने त्यांची पत्नी घाबरून गेली. तिने माझे ताट स्वयंपाकघरात वाढायला साफ

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

नकार दिला. पण माझे मास्तर शिवसुब्रमणीया अजिबात गडबडले नाहीत किंवा आपल्या पत्नीवर रागावलेही नाहीत. माझ्या शेजारी बसून बाहेरच्या खोलीत आपल्या हाताने त्यानी मला वाढले अन शेजारी बसून ते स्वतः जेवू लागले.

रामेश्वर सोडून जिल्ह्याच्या ठिकाणी रामनाथपुराला शिक्षण घेण्यासाठी मी माझ्या वडिलांकडे परवानगी विचारली.

ते म्हणाले 'अबुल, तुला मोठे व्हायचे असेल, तर गाव सोडून शिक्षणासाठी बाहेर जायलाच हवे. रामेश्वरच्या स्टेशनवर गाडीत बसवून निरोप देताना त्यानी म्हटले, या गावात तुझे शरीर राहत होते, आत्मा नाही. तुझ्या आत्म्याचा निवास उज्वल भविष्याच्या पोटी आहे. आम्ही कुणी तिथवर पोचू शकणार नाही. आमची स्वप्नेसुद्धा तिथवर जाऊ शकणार नाहीत. अल्लाची तुझ्यावर सदैव कृपा राहूदे.'

शमसुद्दीन आणि जलालुद्दीन माझ्यासोबत रामनाथपुरमला आले. त्यानी माझे नाव शाळेत घातले. माझी राहाण्याची नीट व्यवस्था केली. मला घराची ओढ अस्वस्थ करायची आणि म्हणून रामेश्वरला जायची प्रत्येक संधी मी उडी मारून साधायचो. इथे असलेल्या शिक्षणाच्या उदंड संधीपेक्षा आईच्या हातच्या गोड पोळयांची ओढ मला मोलाची वाटत असे.

पण हळूहळू माझे घरापासून दूर जाणे मी स्वीकारत गेलो. नव्या वातावरणाशी जुळवून घ्यायचे मी मनाशी ठरवले. कारण माझ्या वडिलांच्या माझ्याकडून विशेष अपेक्षा आहेत, हे मला ठाऊक होते. मी कलेक्टर व्हावे, अशी त्यांची इच्छा होती. त्यांचे स्वप्न पुरे करणे माझे कर्तव्य होते. रामेश्वरमध्ये वाटणारी सुरक्षितता, तिथले प्रेमळ वातावरण यांचा त्याग करणे मला भाग होते.

मला नियतीने रामेश्वरला परत आणले नाही. मला माझ्या बालपणापासून माझ्या घरापासून दूर नेले.... माझ्या उज्वल भवितव्याच्या दिशेने.....

**शब्दार्थ :**

चण - बांधा
अगाध - प्रचंड
उपजत - जन्मतः
सर्जनशीलता - निर्माण करण्याची क्षमता.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. कलामांचा जन्म कोठे झाला?
2. बहादूर ही पदवी कोणास मिळाली होती?
3. रामेश्वरच्या शिवमंदिराचे पुजारी कोण होते?
4. धनुष्कोडीला स्थानिक भाषेत काय म्हणतात?
5. कलामच्या वडिलांनी कोणता व्यवसाय करण्याचे ठरविले?
6. जोहराचा विवाह कोणाशी झाला?
7. रामेश्वरच्या देवळात कोणता उत्सव साजरा होई?
8. रामेश्वर बेटावर इंग्रजी येणारा माणूस कोण होता?
9. कलामांचे मित्र कोणकोण होते?
10. सर्वात लोकप्रिय तामिळ वृतपत्र कोणते?

**प्र2. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1. कलाम कोणाकोणाकडून काय काय शिकले?
2. कलामांच्या वडिलांचा दिनक्रम कोणता होता?
3. कलामांनी आईबद्दलचे प्रेम कसे व्यक्त केले आहे?
4. शिक्षणासाठी बाहेर जाताना कलामांना वडिलांनी काय सांगितले?
5. प्रार्थनेतील शब्दाचा कोणता अर्थ वडीलांनी कलामाना सांगितला?

**प्र3. खालील प्रश्नांची चार ते पाच वाक्यात उत्तरे लिहा.**

1. संध्याकाळच्या नमाजानंतर कलामांचे वडील काय करत असत?
2. तामिळ वृत्तपत्र वाचनाचे कोणकोणते उद्देश लेखकाने सांगितले आहेत?
3. कलामांच्या वडिलांची बोट समुद्रार्पण कशी झाली?
4. घरापासून शिक्षणासाठी दूर जाणे कलामांनी का स्वीकारले?
5. त्यावेळी गावामध्ये वृत्तपत्र व्यवसाय कसा चालत असे?

**प्र4 खालील प्रश्नांची आठ ते दहा वाक्यात उत्तरे लिहा.**

1. कलाम प्राथमिक शाळेत असताना कोणता प्रसंग घडला?
2. अहमद जलालुद्दीन व कलाम यांच्यातील मैत्रीचे वर्णन करा.
3. शिवसुब्रमणिया अय्यर यांच्याकडे घडलेल्या प्रसंगाचे वर्णन करा.
4. कलामानी आपल्या आईवडिलांचे वर्णन कसे केले आहे?

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**प्र5. रिकाम्या जागा भरा.**

1. आमच्या वस्तीत एक जुनी ........ होती.
2. माझ्या वडिलांनी ......... बांधायचा व्यवसाय करण्याचे ठरविले.
3. ........ यानी माझ्या बहिणीशी - जोहराशी विवाह केला.
4. आमच्या गावात........ नावाचे एक माजी क्रांतीकारक राष्ट्रभक्त राहत होते.
5. मी आणि ..... नेहमी एकमेकांशेजारी पहिल्या बाकावर बसत होतो.

**संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1. 'त्या दयाळू, कृपाळू अल्लाचे आभार माना.'
2. 'कलाम, मोठमोठ्या शहरातील सुशिक्षित लोकांच्या तोडीचे तू व्हायला हवेस.'
3. 'तुझ्या आत्म्याचा निवास उज्वल भविष्याच्या पोटी आहे.'
4. 'माफी तरी मागा किंवा ही शाळा, गाव सोडून जा.'

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**भाषाभ्यास:**

**खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

1. मात करणे
2. गुण्यागोविंदाने राहणे
3. रस असणे
4. हातभार लागणे

**उपक्रम:**

1. डॉ. कलामांचे 'विद्यार्थी जीवन' या विषयी निबंध लिहा.
2. डॉ. कलामांविषयी अधिक माहिती मिळवा.

*********

# 11. पाहुणचार

A6U1H8

**- ग.ल. ठोकळ**

**परिचय:-**

गजानन लक्ष्मण ठोकळ (1909-1984) सुरुवातीला काही वर्षे शिक्षक म्हणून काम पाहिले. नंतर श्री लेखन वाचन भांडार सुरू केले. त्यांचे लेखन वैविध्यपूर्ण आहे. त्यांचे कडूसाखर, गोंदण, ठोकळगोष्टी हे कथासंग्रह; कशासाठी पोटासाठी हे नाटक; गावगुंड, टेंभा, ठिणगी या कादंबऱ्या; मीठभाकर, सुगी हे ग्रामीण काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत.

खेड्यातील लोकांचे जीवन साधेसुधे असते. गरीब शेतकऱ्याकडे आलेल्यांचा पाहुणचार तो किती प्रेमाने करतो याचे वर्णन या कवितेत आढळते. ही कविता 'सुगी' या काव्यसंग्रहातून निवडली आहे.

*(मूल्य, आतिथ्य)*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

या बसा पाव्हणं असं राम राम घ्या
कोनच्या तुम्ही गावांच? गाठुडं तिठ राहु द्या।
घोंगडी टाकली इठं, बसा तीवर
अनमान करू नको आता हे समजा अपलं घर
वाटुळ चालता जनू लई भागला
हे पगा काढलंय पाणी आंघूळ कराया चला
आटपा बिगीनं जरा, ताट वाळलं
पाव्हनं, चला या आता, हे पगा पिढं टाकल
वाढली पगा ज्वारिची जाड भाकरी
निचितीनं जेवा आता, जायचं ना शेतावरी
लई सुगरण मपली बरं कारभारिण
किती अपरूक झालं हाय हे कांद्याचं बेसन!
लसणीची चटणी उजून पगा वाढली
ती मधून तोंडी लावा, लागती तिखट चांगली!



चापून आतां होउ द्या, करू नका कमी
मीठ भाकरी गरिबाची घ्या गोड करोनी तुम्ही
'जायचं' काय म्हंणता? झोप घ्या जरा
जाताल उद्यां का घाई? छे बेत नव्हं हा बरा!

शेवटी निघालांत ना? जपूनीच जा.
गरिबाची ओळख ठेवा. या बरं राम राम घ्या!

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पाव्हणं | - | पाहुणे | कोनच्या | - | कोणत्या |
| गाठुडं | - | गाठोडे | इठ | - | इथे |
| अनमान | - | हयगय | वाढुल | - | पुष्कळ |
| भागला | - | दमला | पगा | - | पहा |
| आंघुळ | - | आंघोळ (स्नान) | बिगीन | - | लवकर |
| पिढं | - | पाट | निचितीन | - | शांत चित्ताने, शांत मनाने |
| सुगरण | - | उत्तम स्वयंपाक करणारी | मपली | - | माझी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कारभारीण | - | पत्नी, बायको | अपरूक | - | चवदार |
| बेसन | - | झुणका, पिठलं | चापून | - | भरपूर खावून |
| मीठ भाकरी | - | गरीबाचं साधं जेवण | बेत | - | विचार |
| रामराम घ्या | - | नमस्कार | जाताल | - | जाल |
| उजुन | - | अजून | | | |

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

1. कारभाऱ्याने पाहुण्याला बसायला काय दिले?
2. कारभाऱ्याने पाहुण्याला अंघोळ लवकर उरकण्यास का सांगितले?
3. जेवणात कोणकोणते पदार्थ होते?
4. कारभाऱ्याने सुगरण कोणास म्हटले आहे?
5. कोणता पदार्थ अपरूक झाला होता?
6. कोणता पदार्थ तिखट होता?

**प्र2. खालील प्रश्नांची उत्तरे 2 ते 3 वाक्यात लिहा.**

1. घरी आलेल्या पाहुण्याचा प्रवासात झालेला त्रास कमी व्हावा म्हणून घरच्या कारभाऱ्याने काय केले?
2. पाहुण्याच्या जेवणाची व्यवस्था कशा तऱ्हेने केली?
3. आपल्या कारभारीणीचा मोठेपणा कारभारी कसा व्यक्त करतो?

**प्र3. खालील प्रश्नांची उत्तरे 4 ते 5 वाक्यात लिहा.**

1. घरी आलेल्या पाहुण्याचा आदर सत्कार कारभारी कशा तऱ्हेने करतो?
2. पाहुण्याला आणखी राहण्याचा आग्रह शेतकऱ्याने कसा केला आहे?

**प्र4. खालील ओळीचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1. हे पगा काढलंय पाणी आंघुळ कराया चला.
2. लसणीची चटणी अजून पगा वाढली.

**प्र5. खालील प्रश्नांचे उत्तर सात-आठ वाक्यात लिहा.**

1. या कवितेचा अर्थ तुमच्या शब्दात लिहा.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**प्र6. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

1. .................... चालला जणू लई भागला.
2. पाव्हणं  चला या आता हे पगा .................... टाकलं.
3. लई .................... मपली बरं कारभारीण
4. .................... चटणी उजुन पगा वाढली.
5. .................... गरीबाची घ्या गोड करूनी
6. गरीबाची .................... ठेवा या बरं रामराम घ्या
7. निचितीन जेवा आता .................... शेतावरी

**भाषाभ्यास :-**

**1. पाठात दिल्याप्रमाणे जोडशब्द पूर्ण करा.**

1. मीठ ..................

**2. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

1. पाहुणचार करणे.   2. अनमान करणे.

**3. समानार्थी शब्द लिहा.**

पाहुणचार - आदरातिथ्य

गाव - ....................   पाहुणा - ....................

तोंड - ....................   आंघोळ - ....................

झोप - ....................

**4. विरुद्धार्थी शब्द लिहा :-**

1. ओळख ×   4. आता ×
2. गरीब ×   5. कमी ×
3. गोड ×   6. शेवट ×

**5. खालील शब्द प्रमाण मराठी भाषेत लिहा :-**

1. बेसन   2. लई   3. पगा   4. उजुन   5. आंधुळ

**उपक्रम :-**

1. ग्रामीण भाषेतील 'आम्ही ठाकर ठाकर' हे गीत वाचा व पाठ करा.
2. शंकर पाटील यांची 'खेळ' ही ग्रामीण कथा वाचा.

❋❋❖❖❖❖❋❋

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 12. वाट चुकल्याचा आनंद

D5Z8N7

- ना. सी. फडके

**परिचय :-**

पद्मभुषण प्रा. नारायण सीताराम फडके (1894-1978) लेखक, प्राध्यापक, कथा, लघुनिबंध, चरित्र, आत्मचरित्र, नाटक या सर्व क्षेत्रात लीलया संचार करणारे म्हणून नासीना ओळखले जाते. आल्ला-हो-अकबर, कुलाब्याची दांडी, दौलत, निरंजन, अखेरचे बंड अशा 84 कादंबऱ्या; अनेक कथासंग्रह, गुजगोष्टी, नव्या गुजगोष्टी हे लघुनिबंध संग्रह तसेच प्रतिभासाधन, प्रतिभाविलास हे समीक्षात्मक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांना लघुनिबंधाचे प्रवर्तक असे म्हटले जाते. रत्नागिरी येथे भरलेल्या अ.भा.म.सा. संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

पुढील लघुनिबंध हा त्यांच्या 'गुजगोष्टी' या लघुनिबंध संग्रहातून निवडला आहे.

एखाद्या नवीन ठिकाणी गेल्यावर आपली वाट चुकते. लेखक एकदा महाबळेश्वरला गेले असताना बाजारातून घरी परतताना त्यांची वाट चुकते. पण वाट चुकल्यामुळे त्यांना दुःख होण्याऐवजी आनंदच झाला. का ते या लघुनिबंधात पाहू!

*(मूल्य-निसर्गप्रेम)*

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

मी एकदा वाट चुकलो आणि मग!

पण कुठली वाट चुकलो अन् कशी चुकलो ते आधी सांगतो. आश्विनाचे दिवस होते. अन् आम्ही महाबळेश्वरला राहायला गेलो होतो. आम्ही ज्या बंगल्यात रहात होतो तो बाजारपेठेपासून चांगला दोन अडीच मैल लांब होता. अन् अगदी एका बाजूला जवळ-जवळ जंगलात असल्यासारखा होता. महाबळेश्वरच्या सीमेतला त्या दिशेकडला अगदी शेवटचा बंगला होता तो. मळलेली वाट त्या बंगल्यापासून चांगली दोन-तीन हाकांच्या अंतरावर होती.

एक दिवस काय झालं, दुपारी तीन वाजता थोडे कागद विकत आणावे म्हणून मी बाजारात गेलो. दुकानात एक मित्र अकस्मात भेटला अन् त्यांनी आग्रह केला म्हणून चहा घ्यायला त्यांच्या घरी गेलो. चहाच्या निमित्ताने बसलो. ओघाओघानं गप्पावरून गप्पा निघाल्या अन् नकळत खूप वेळ घालवला मी तिथे! साडेचार वाजल्याचं कुणीसं सहज बोललं, तेव्हा मी दचकून उठलो. चहा देणाऱ्या मित्रांना नमस्कारसुद्धा न करता त्यांच्या घराबाहेर पडलो. कारण घरच्या मंडळीना मी कबूल केलं होतं की चार वाजता मी परत येईन अन् मग आपण फिरायला जाऊ. आता मला पोचायला निदान पाच तरी वाजणार होते. किती चढ-उतार करीत अन् वळणं घेत गेला होता तो रस्ता.

तितक्यात माझ्या मनात एक कल्पना आली.

मळलेल्या वाटेनं जायच्याऐवजी उजव्या हाताकडच्या झाडीत घुसून बंगल्याच्या धोरणानं आपण गेलो तर, आपला कितीतरी वेळ वाचेल. या कल्पनेने माझ्या मनात एकदम निश्चय झाला. आणखी उजव्या हाताकडच्या झाडीत मी घुसलो.

पण पन्नास साठ पावलं गेलो नसेन, झाडी इतकी गर्द झालेली आढळून आली की, अगदी नाकापुढच्या झाडाखेरीज मला दुसरं काही दिसेना. गर्द झाडांच्या फटीफटीतून आभाळाचे लहान मोठे खवले दिसत होते. पण त्यावरून दिशेचा आदमास करावा म्हटले तर सोय होती काय? पोस्ट ऑफिसच्या वायव्य दिशेला बंगला होता खरा. पण वायव्य कोणती आणि आग्नेय कोणती हेच कळेनासे झाल्यावर त्या माहितीचा काय उपयोग होता? मोठ्या रस्त्याला जाऊन मिळावं यासारखा दुसरा शहाणपणा नाही.

मी वळलो अन् झाडांच्या फांद्या दोन्ही हातांनी दूर करीत हिंगण बेटाच्या ठेंगण्या काटेरी झुडूपावरून अलगत ओलांडून पलिकडे पाऊले टाकीत जाऊ लागलो. पण असा बराच गेलो तरी मोठा रस्ता मला मिळेना. मग काय करणार?

तसाच पुढे जात राहिलो. तेव्हा थोडीशी मळलेली एक पाऊलवाट दिसली. तेव्हा जो आनंद झाला तो विचारू नका. महाबळेश्वराच्या डोंगराचे कधी पाहिले नव्हते, असे भाग मला दिसू लागले. ती वाट कुठे जात असावी मला कळेना. चांगलाच घाबरलो मी. पण तसाच तुटलेल्या कड्याच्या माथ्यावर गेलो आणि बसलो. तेथून जी सृष्टी शोभा दिसत होती, ती अपूर्व होती. एका दरीच्या ऐन तोंडावर तो कडा डोकावत होता. दोन्ही बाजूस शेकडो फूट उंचीचे डोंगराचे कडे दिसत होते.

© KTBS
NOT TO BE REPUBLISHED



सृष्टीचं इतकं अकृत्रिम स्वरूप मला या आधी कधीच दिसलं नव्हतं. त्या दृश्याकडे सारं भान विसरून मी पाहात राहिलो. ते पाहण्यात मग्न झाल्यामुळे वर आभाळात काय काय घटना चालल्या होत्या तिकडं माझं लक्षही नव्हतं. काळे काळे प्रचंड ढग माझ्या माथ्यावर येवून तरंगू लागले होते. जणू मोठ मोठी काळ्या काळ्या रंगाची कुठली तरी विमानेच तेथे येवून हवेत क्षणभर विसावा घेत होती! मी ढगांकडे पुरतं पाहिलंही नाही. तोच वाऱ्याचे वाकडे तिकडे झोत हवेत उठले अन् ढगातून पाण्याचे थेंब पडू लागले.

जलधारांची दाटी विरळ विरळ व्हायला लागली होती. शत्रूवर अचानक छापा घालून पुढे निघून जाणाऱ्या सैन्याच्या थव्याप्रमाणे ढग भरभरा निघून चालले होते. आकाशाचा निळा रंग पुन्हा प्रकट व्हायला लागला होता. भोवतालची दाट झाडी स्पष्ट दिसू लागली होती. 10-15 मिनिटांनी सूर्यप्रकाशही पुन्हा पहिल्या थाटाने जिकडे तिकडे भरला अन् अखेर पूर्व क्षितिजावर जे प्रचंड इंद्रधनुष्य प्रकट झालं त्या शोभेला उपमा कुठली? आणि काय चमत्कार दुसऱ्याच क्षणी इंद्रधनुष्याची ती सबंध प्रचंड कमान माझ्याजवळ सरकत येत आहे असे मला वाटले.

काही झालं तरी मला इथून निघून घरी गेलचं पाहिजे असा विचार माझ्या मनात आला. पण पुन्हा वाटलं, रस्ता सापडणार कसा? जावं त्या पाऊलवाटेने अन् पहावी नशीबाची परीक्षा, असं मनाशी ठरवून मी झपाझप चालू लागलो.

अन् काय आश्चर्य! दहा पंधरा मिनिटे असा गेलो तोच एकदम हमरस्त्यालाच पोहोचलो मी!

वाट चुकली कशी हे जसं मला कळलं नाही. त्याचप्रमाणे ती अचानक सापडली कशी तेही मला कळलं नाही! अन् वाट पुन्हा सापडलेल्या आनंदापेक्षा वाट चुकल्यामुळे सृष्टीतील अत्यंत उग्र आणि अत्यंत सुंदर अशा दृष्यांचं दर्शन घडून त्या आनंदाने माझं अंतःकरण डवरलं होतं. तो आनंद किती तरी मोठा होता.

पुन्हा केव्हातरी अशीच माझी वाट चुकावी अशी माझी फार फार इच्छा आहे!

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | |
|---|---|---|
| मळलेली | - | रुळलेली |
| गर्द | - | दाट |
| हिंगण बेट | - | खुरटी काटेरी वनस्पतींची झुडुपे |
| माथा | - | डोंगर टोकावरील सपाट जागा |
| खडक | - | पाषाण, पसरट दगड |
| अकस्मात | - | अचानक |
| आदमास | - | अंदाज |
| अपूर्व | - | पूर्वी न पाहिलेले |
| रंगछटा | - | विविध रंगांचे दर्शन |

| | | |
|---|---|---|
| तरंगणे | - | आकाशात फिरणे |
| अकृत्रिम | - | नैसर्गिक |
| विसावा | - | विश्रांती |
| क्षितिज | - | जेथे आकाश जमीनीला टेकल्यासारखे भासते ती जागा. |
| इंद्रधनुष्य | - | सूर्य असताना पाऊस पडल्यावर आकाशात दिसणारी सप्तरंगी कमान. |

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय लिहा.**

1. लेखक बाजारात का गेले होते?
   - अ. भाजी आणण्यास
   - ब. कागद आणण्यास
   - क. गाव पाहण्यास
   - ड. फिरण्यासाठी
2. लेखक मित्राच्या घरी कशासाठी गेले होते?
   - अ. चहासाठी
   - ब. भेटण्यास
   - क. पुस्तक आणण्यासाठी
   - ड. लग्न ठरविण्यासाठी
3. लेखकांनी घरच्या मंडळींना काय कबूल केले होते?
   - अ. सिनेमाला जाण्याचे
   - ब. मंदिराला जाण्याचे
   - क. फिरायला जाण्याचे
   - ड. नाटकाला जाण्याचे
4. 'वाट चुकल्याचा आनंद' या पाठाचे मूल्य कोणते आहे?
   - अ. लघुनिबंध
   - ब. व्यक्तीमहात्म्य
   - क. निसर्गप्रेम
   - ड. प्रामाणिकपणा

**प्र2. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. ना.सी. फडके यांचे पूर्ण नाव काय?
2. वाट चुकल्याचा आनंद हा पाठ कोणत्या पुस्तकातून निवडला आहे?
3. लेखक कोठे राहावयास गेले होते?

**प्र3. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा.**

1. लेखक दचकून केव्हा उठले?
2. लेखक उजव्या हाताकडील झाडीत का घुसले?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र4. संदर्भासह स्पष्टीकरण करा -**

1. साडेचार वाजल्याच कुणी सहज म्हटल...
2. पुन्हा केव्हातरी वाट चुकावी अशी माझी इच्छा आहे.

**प्र5. खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यात लिहा.**

1. लेखकाने कोणती निसर्गशोभा पाहिली?
2. क्षितिजावर इंद्रधनुष्य केव्हा प्रकट झाले?

**प्र6. खालील प्रश्नांची उत्तर सात-आठ वाक्यात लिहा.**

1. आकाशात ढग आल्यानंतरच्या दृष्याचे वर्णन करा.

**भाषाभ्यास :-**

**पुढील ओळीतील अलंकार ओळखा व व्याख्या लिहा.**

1. जणू मोठमोठी काळ्या काळ्या रंगाची कुठली तरी विमाने तेथे येऊन हवेत क्षणभर विसावा घेत होती.
2. शत्रूवर अचानक छापा घालून पुढे निघून जाणाऱ्या सैन्याच्या थव्याप्रमाणे ढग भरभरा निघून चालले होते.

**उपक्रम :-**

1. वि.स. खांडेकर यांचा 'मंझधार' हा लघुनिबंध संग्रह मिळवून वाचा.
2. 'माचीवरचा बुधा' हे गो.नि. दांडेकर यांचे निसर्ग वर्णनपर पुस्तक मिळवून वाचा.

********

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# व्याकरण

## वर्णमाला

आपल्या मुखावटे निघणाऱ्या मूळ ध्वनींना 'वर्ण' असे म्हणतात. अक्षरांना ध्वनीचिन्ह असे म्हणतात. मराठीत 48 वर्ण मानतात.

वर्णाचे मुख्य प्रकार दोन आहेत. 1) स्वर 2) व्यंजन

एकूण स्वर 14 आहेत.

## स्वरांचे वर्गीकरण

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | |
|---|---|---|
| ऱ्हस्व स्वर | अ, इ, उ, ऋ. ऌ | सजातीय स्वर<br>अ, आ, इ, ई, उ, ऊ |
| दीर्घ स्वर | आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ | विजातीय स्वर<br>अ-इ, अ-उ, आ-ऊ |
| स्वरादी | अं. अः | अ-ए |

विजातीय स्वरांच्या अनेक जोड्या होऊ शकतात.

एकूण व्यंजने 34 आहेत.

## व्यंजनाचे वर्गीकरण

| | |
|---|---|
| कठोर व्यंजने | क् ख् च् छ् ट् ठ् त् थ् प् फ् श् ष् स् |
| मृदू व्यंजने | ग् ध् ज् झ् ड् ढ् द् ध् ब् भ् य् र् ल् व् ह् ळ् |
| अनुनासिके | ङ् ञ् ण् न् म् |

# मराठी भाषेची वर्णमाला व वर्णांचे प्रकार

- स्वर (12)
- स्वरादी (2) स्वर
- स्वरांत किंवा व्यंजने (34)

**स्वर**

| ऱ्हस्व | दीर्घ | संयुक्त |
|---|---|---|
| अ ए उ ऋ ऌ | आ ई ऊ | ए ऐ ओ औ |

**स्वरादी**

- अं
- अः

**स्वरांत किंवा व्यंजने**

| स्पर्श | अर्धस्वर (अंतस्थ) | उष्म (घर्षक) | महाप्राण | स्वतंत्र |
|---|---|---|---|---|
| | य र ल व | श ष स | ह् | ळ |

**स्पर्श व्यंजने**

| | कठोर | मृदु | अनुनासिक |
|---|---|---|---|
| क - वर्ग | क् ख् | ग् घ् ङ | ङ् |
| च - वर्ग | च् छ् | ज् झ् ञ | ञ् |
| ट - वर्ग | ट् ठ् | ड् ढ् ण | ण् |
| त - वर्ग | त् थ् | द् ध् न् | न् |
| प - वर्ग | प् फ् | ब् भ् म् | म् |

**स्पर्श व्यंजने** :- क् ख् पासून भ् म् पर्यंत ही पंचवीस व्यंजने उच्चारताना फुफ्फुसातील हवेचा जीभ, कंठ, तालु, मुर्धा, दात, ओठ यांच्याशी स्पर्श होतो. मग ती हवा तोंडावाटे बाहेर पडते. म्हणून या व्यंजनाना स्पर्श व्यंजने म्हणतात.

**अर्धस्वर** :- 'य र ल व' याना अर्ध स्वर म्हणतात. कारण यांचा उचार अनुक्रमे इ ऋ ऌ व उ या स्वरासारखा होतो. म्हणून याना अर्ध स्वर म्हणतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उष्म (घर्षक)** : श ष स ही व्यंजने उच्चारताना हवेचे घर्षण होते, उष्णता निर्माण होते म्हणून याना 'उष्मे' किंवा 'उष्म व्यंजने' असे म्हणतात.

**महाप्राण** : 'ह' या वर्णाचा उच्चार करताना जोर लागतो. हवा जोराने बाहेर फेकली जाते म्हणून याला 'महाप्राण' म्हणतात. 'ख, घ, छ झ, ठ, ढ, थ, ध, फ, श, ष या व्यंजनांच्या उच्चारात 'ह' उच्चारांची छटा असल्याने यांनाही 'महाप्राण' म्हणतात.

**अल्पप्राण** : क या वीस व्यंजनाना अल्पप्राण म्हणतात. 'ळ' हा स्वतंत्र वर्ण मानला जातो.

**अनुनासिके** : ङ ञ ण न म या व्यंजाना 'अनुनासिके' म्हणतात. या व्यंजनाचा उच्चार करताना हवा थोडी नाकातून व थोडी मुखातून बाहेर पडते. अनुनासिकाचा स्पष्ट उच्चार दाखविण्यासाठी अनुस्वार (ं) वापरतात.

**कठोर वर्ण** : जे वर्ण उच्चारायला कठीण आहेत त्यांना कठोर वर्ण/व्यंजने म्हणतात. प्रत्येक वर्गातील पहिली दोन व्यंजने व श् ष् स् ही कठोर व्यंजने आहेत.

**मृदु व्यंजने** : जे वर्ण उच्चारायला कोमल असतात. त्यांना मृदु व्यंजने किंवा मृदु वर्ण म्हणतात. सर्व स्वर व प्रत्येक वर्गातील शेवटची तीन व्यंजने य् र् ल् व् ह् ळ् हे मृदु वर्ण / व्यंजने आहेत.

❇❇❖❇❖❇❖❇❇

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# शब्दांच्या जाती

**शब्द** - अक्षरांच्या अर्थपूर्ण समूहाला शब्द म्हणतात. वाक्यात अनेक शब्द असतात. ह्या शब्दांची निरनिराळी कामे असतात. त्या शब्दांच्या कामावरून त्यांचे प्रकार किंवा जाती ठरविल्या जातात. मराठीत शब्दांच्या जाती आठ आहेत.

शब्द

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद | क्रिया विशेषण | शब्दयोगी अव्यय | उभयान्वयी अव्यय | केवलप्रयोगी अव्यय |

1) **नाम** - व्यक्ती, वस्तू, पदार्थ, स्थळ यांची नावे व त्यांच्या गुणधर्मांना नाम असे म्हणतात. उदा. मुलगा, मुलगी, झाड, पक्षी, गाव, घर, धर्म, नीती इ.

2) **सर्वनाम** - नामाऐवजी वापरल्या जाणाऱ्या शब्दाला 'सर्वनाम' म्हणतात. नामाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सार्वनामिक शब्द वापरला जाते.

3) **विशेषण** - नामाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला 'विशेषण' म्हणतात. उदा. लाल, पिवळा, हुशार, गोड, कडू, दहा, लहान इ.

4) **क्रियापद** - वाक्याचा अर्थ पूर्ण करणाऱ्या क्रियावाचक शब्दाला 'क्रियापद' म्हणतात उदा. खातो, आहे, गेला, लिहितो इ.

5) **क्रियविशेषण** - क्रियापदाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दाला 'क्रिया विशेषण' (अव्यय) असे म्हणतात. उदा. संथ, सावकाश, जलद, मागे, पुढे, फार इ.

6) **शब्दयोगी अव्यय** - जे शब्द नामांना व सर्व नामाना जोडून येतात व शब्दामधील संबंध दाखवितात त्या शब्दांना 'शब्दयोगी अव्यय' से म्हणतात. उदा. झाडावर, टेबलाखाली, घरामागे त्याच्यामुळे इ.

7) **उभयान्वयी अव्यय** - दोन किंवा दोहोपेक्षा जास्त शब्दाना अथवा वाक्यांना जोडणाऱ्या शब्दांना उभयान्वयी अव्यव असे म्हणतात.
उदा. आणि, व, किंवा, पण, परंतु, म्हणून, कारण इ.

8) **केवलप्रयोगी अव्यय** - ज्या शब्दांनी आपल्या मनातील भाव व्यक्त करता येतात. त्या शब्दांना केवल प्रयोगी अव्यय असे म्हणतात. हे शब्द आपल्या तोंडातून सहजपणे बाहेर पडतात.
उदा. : अबब!, अरेरे!, शाबास!, वाहवा!, छे! इ.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**I. नामाचे प्रकार**

अ) सामान्य नाम

ब) विशेष नाम

क) भाववाचक नाम

**अ) सामान्य नाम** - एकाच समूहाला किंवा वर्गाला जे सर्वसामान्य नाव दिले जाते. त्याला 'सामान्य नाम' म्हणतात.
उदा. : पक्षी, झाडे, मुले, घर, गाव, नदी, देश इ.

**ब) विशेषनाम** - ज्या नामाने विशिष्ट व्यक्ति प्राणी स्थळ वा वस्तू यांचा बोध होतो त्याना विशेषनामे म्हणतात. ठेवलेल्या नावाला विशेषनाम म्हणतात.
उदा. : भारत, गंगा, हिमालय, अथर्व, नर्मदा, श्रीलंका, दिल्ली इ.

**क) भाववाचक नाम** - प्राणी, व्यक्ति, वस्तू, स्थळ, अथवा पदार्थ यांचे गुणधर्म किंवा भावना याना भाववाचकनाम म्हणतात.
उदा. : धैर्य, राग, लोभ, प्रेम, हुशारी, चातुर्य इ.

नामानाः पण, पणा, गिरी, य, त्व, ई या सारखे प्रत्यय लावून भाववाचक नामे बनविता येतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**II. सर्वनामाचे प्रकार**

सर्वनामाचे प्रकार सहा आहेत.

1) पुरुषवाचक सर्वनाम - मी, आम्ही, तू, तुम्ही, स्वतः आपण.
2) दर्शक सर्वनाम - तो, ती, ते, हा, ही, हे.
3) संबंधी सर्वनाम - जो, जे, जी, ज्या.
4) प्रश्नार्थक सर्वनाम - कोण? काय? कोणास?
5) अनश्चित सर्वनाम - कोण, कधी, केव्हा, काय.
6) आत्मवाचक सर्वनाम - मी (स्वतः) तो (आपण).

**III. विशेषण**

**विशेषणाचे मुख्य प्रकार तीन आहेत.**

अ) गुण विशेषण ब) संख्या विषेषण क) सार्वनमिक विशेषण

अ) गुण विशेषण - नामाचा गुण दाखविणारा शब्द
उदा. हुशार (मुली), गोड (फळे), गरीब (माणूस), काळे (मांजर)

ब) संख्या विशेषण - नामाच्या संख्येचा किंवा क्रमाचा बोध होणारा शब्द
उदा. अकरा (खेळाडू), काही (फुले), चार (फोडी), दुप्पट (आकार), अर्धी (भाकर), पाचवा (क्रम)

**IV. क्रियापदाचे प्रकार -**

क्रियापदाचे मुख्य प्रकार दोन आहेत.

1) सकर्मक क्रियापद
2) अकर्मक क्रियापद

**1) सकर्मक क्रियापद -** ज्या क्रियापदाचा अर्थ पूरा होण्यास कर्माची जरूरी लागते त्यास सकर्मक असे म्हणतात.

उदा. : 1) गवळी धार काढतो.
2) बाबांनी आम्हाला चित्रपट दाखविला.

वरील दोन वाक्यात 'काढतो' व 'दाखविला' या क्रियापदांचा अर्थ अनुक्रमे 'धार' व 'चित्रपट' या कर्माशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

**2) अकर्मक क्रियापद -** वाक्यातील क्रियापदांचा अर्थ जेव्हा कर्माशिवाय पूर्ण होतो तेव्हा ते क्रियापद अकर्मक असते.

उदा. 1) मी रस्त्यात पडलो.
2) राजू आला.

वरील वाक्यांचा अर्थ पूर्ण होण्यास कर्माची गरज नाही.

❋❋❖❋❖❋❖❋❋

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# विराम चिन्हे

आपण बोलत असताना मधून मधून थांबतो; कधी वाक्य पूर्ण झाले म्हणून कधी अपूर्ण असताना, कधी उद्‌गार काढण्यासाठी तर कधी प्रश्न विचारावयाचा म्हणून आपण कमी अधिक वेळ थांबतो. या थांबण्याला 'विराम' म्हणतात. आपले हे बोलणे लिहून दाखवावयाचे असेल तर हे विराम वेगवेगळ्या चिन्हांनी दाखवावे लागतात या चिन्हांना 'विराम चिन्हे' म्हणतात. विरामचिन्हे दोन प्रकारची असतात.

1) विराम किंवा थांबण्याचा काळ दाखविणारी (विराम दर्शक)
2) अर्थ स्पष्ट करणारी (अर्थदर्शक)

आपल्या मराठी भाषेतील महत्त्वाची विरामचिन्हे खालील प्रमाणे.

| क्र. | चिन्हाचे नाव | चिन्ह | केव्हा वापरतात? | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| 1. | पूर्ण विराम | . | 1) विधान किंवा वाक्य पूर्ण झाले हे दाखविण्यासाठी<br>2) शब्दांचा संक्षेप दाखविण्यासाठी आद्याक्षरापुढे | 1) तो घरी गेला.<br>2) ता.क. = ताजा कलम |
| 2. | अर्ध विराम | ; | दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययानी जोडली असताना | ढग खूप गर्जत होते; पण पाऊस पडला नाही. |
| 3. | स्वल्प विराम | , | 1) एकाच जातीचे शब्द लागोपाठ आल्यास<br>2) संबोधन दर्शविताना | 1) हुषार, अभ्यासू, खेळकर व आनंदी मुले सर्वांना आवडतात.<br>2) मधू, इकडे ये. |
| 4. | प्रश्न चिन्ह | ? | प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटी | तू केव्हा आलास? |
| 5. | उद्‌गारवाचक चिन्ह | ! | भावना व्यक्त करताना ती दाखविणाऱ्या शब्दाच्या शेवटी | अरेरे! तो नापास झाला.<br>शाबास! छान खेळलास. |
| 6. | अवतरण चिन्ह | "..."<br>'.....' | (दुहेरी) बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दाखविण्याकरिता<br>(एकेरी) एखाद्या शब्दावर जोर द्यावयाचा असता<br>✻ पुस्तकाचे नाव वगैरे | तो म्हणाला, "मी येईन."<br>शिवाजी सावंत यांची 'छावा' कादंबरी प्रसिद्ध आहे. |

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**या पैकी पहिली तीन चिन्हे ही विराम दर्शक आहेत. त्यापुढील तीन चिन्हे अर्थदर्शक आहेत.**

# लिंग विचार

नामाच्या रूपावरून एखादी वस्तू वास्तविक अगर काल्पनिक पुरुष जातीची आहे, की स्त्री जातीची आहे, की दोन्हीपैकी कोणत्याच जातीची नाही असे ज्यावरून कळते त्याला त्या वस्तूचे लिंग असे म्हणतात.

मराठीत तीन लिंगे मानतात.

लिंग
1) पुल्लिंग
2) स्त्रीलिंग
3) नपुंसकलिंग

मोठा आकार, शक्ती, कठोरपणा, राकटपणा या सारखे पुरुष प्राण्यांचे सर्वसामान्य गुणधर्म असलेल्या निर्जीव वस्तू पुल्लिंगी मानतात. तर लहान आकार, कोमलपणा, देखणेपणा, सौम्यपणा, चांचल्य या सारखे स्त्री प्राण्यात आढळणारे सर्वसामान्य गुणधर्म असणाऱ्या निर्जीव वस्तू स्त्रीलिंग मानतात.

उदा. :

| | **पुल्लिंग** | **स्त्रीलिंग** |
|---|---|---|
| | लोटा | लोटी |
| | वारा | झुळूक |
| | वृक्ष | वेल |

या नियमाला / अपवाद काही आहेत

उदा. :

| | **पुल्लिंग** | **स्त्रीलिंग** |
|---|---|---|
| | दोरा | दोरी |
| | ओढा | नदी |

मराठीत एकाच अर्थाचे शब्द तीन वेगवेगळ्या लिंगात आढळतात.

उदा. :

| | **पुल्लिंग** | **स्त्रीलिंग** | **नपुंसकलिंग** |
|---|---|---|---|
| | ग्रंथ | पोथी | पुस्तक |
| | देह | काया | शरीर |

मराठीत लिंग व्यवस्था अनियमित आहे. नियम असला तरी त्याला अपवादच जास्त असतात. एखादा शब्द पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी का? हे सांगणे कडिण आहे. रूढी किंवा परंपरा हेच त्याचे उत्तर होय. भाषा ऐकण्याने व बोलण्यानेच लिंग व्यवस्था समजून घेता येईल.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

लिंग भेदामुळे नामाच्या रूपात होणारे बदल लक्षात घेण्यासाठी काही नियम पुढील प्रमाणे -

1) आ-कारांत पुल्लिंगी प्राणीवाचक नामांचे स्त्रीलिंगी रूप ई-कारांत व नपुंसकलिंगी रूप ए-कारांत होते.

| उदा. : | **पुल्लिंग** | **स्त्रीलिंग** | **नपुंसकलिंग** |
|---|---|---|---|
| | मुलगा | मुलगी | मुलगे |
| | पोरगा | पोरगी | पोरगे |
| | घोडा | घोडी | घोडे |

2) काही प्राणीवाचक पुल्लिंगी शब्दास 'ईण' प्रत्यय लावल्यास त्या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप मिळते.

| उदा. : | **पुल्लिंग** | **स्त्रीलिंग** |
|---|---|---|
| | सुतार | सुतारीण |
| | पाटील | पाटलीण |
| | वाघ | वाघीण |
| | माळी | माळीण |

3) काही प्राणीवाचक अ-कारांत पुल्लिंगी नामाची स्त्रीलिंगी रूपे ई-कारांत होतात.

| उदा. : | **पुल्लिंग** | **स्त्रीलिंग** |
|---|---|---|
| | हंस | हंसी |
| | बेडूक | बेडकी |
| | गोप | गोपी |
| | तरुण | तरुणी |

4) काही आ-कारांत पुल्लिंगी पदार्थवाचक नामाची स्त्रीलिंगी रूपे ई-कारान्त असतात. ती लहान आकार सुचवितात.

| उदा. : | **पुल्लिंग** | **स्त्रीलिंग** |
|---|---|---|
| | लोटा | लोटी |
| | गाडा | गाडी |
| | दांडा | दांडी |

5) काही शब्दाची स्त्रीलिंगी रूपे स्वतंत्र रीतीने होतात.

| उदा. : | **पुल्लिंग** | **स्त्रीलिंग** |
|---|---|---|
| | बाप | आई |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | |
|---|---|
| राजा | राणी |
| भाऊ | बहीण |
| नवरा | बायको |
| रेडा | म्हैस |
| बैल | गाय |
| बोका | भाटी |

6) काही शब्द वेगवेगळ्या लिंगात वापरले जातात.

| | | |
|---|---|---|
| उदा. : | वेळ | (पु.स्त्री) |
| | हरीण | (पु.न.) |
| | पोर | (पु.स्त्री.न.) |
| | नेत्र | (पु.न.) |

7) सामासिक शब्दाचे लिंग शेवटच्या शब्दाच्या लिंगाप्रमाणे असते.

| | | |
|---|---|---|
| उदा. | साखर भात | (पु.) |
| | मीठ भाकरी | (स्त्री) |
| | देवघर | (न.) |
| | भाजीपाला | (पु.) |
| | भाऊबहीण | (स्त्री) |

8) परभाषेतून आलेल्या शब्दाचे लिंग त्याच अर्थाच्या मराठी शब्दाच्या लिंगावरून सामान्यतः ठरवितात.

| | | |
|---|---|---|
| उदा. | बूट (जोडा) | (पु.) |
| | कंपनी (मंडळी) | (स्त्री) |
| | बुक (पुस्तक) | (न) |

9) मासा, गरुड, पोपट, साप या सारख्या पुल्लिंगी व स्त्रीलिंगी असणाऱ्या प्राण्यांचा उल्लेख फक्त पुल्लिंगीच करतात; तर घार, सुसर, घूस, ऊ सारख्या पुल्लिंगी व स्त्रीलिंगी असणाऱ्या प्राण्यांचा उल्लेख केवळ स्त्रीलिंगीच करतात.

❋❋❖❋❖❋❖❋❋

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# वचन विचार

नामाच्या ठिकाणी संख्या सुचविण्याचा एक गुणधर्म असतो त्यास वचन असे म्हणतात.
वचन म्हणजे बोलणे. नामावरून जसे लिंग समजते, तसे संख्येवरून वचन समजते.
मराठीत वचनाचे प्रकार दोन आहेत.

1) एक वचन 2) अनेक वचन (बहुवचन)

**1) एक वचन** - नामाच्या स्वरूपावरून जेव्हा एकाच वस्तूचा बोध होतो तेव्हा त्यास एकवचन म्हणतात.

**2) अनेक वचन** - जेव्हा नामाच्या किंवा तशा प्रकारच्या शब्दांच्या रूपावरून एका पेक्षा अधिक संख्येचा बोध होतो तेव्हा त्यास अनेक वचन म्हणतात.
उदा. : गाई, वासरे, झाडे, शहरे, गावे, जिल्हे, पुस्तके इ. वचन भेदामुळे नामाच्या रूपात होणारा फरक.

नामाचे जे मूळ रूप असते तेच त्याचे एक वचन असते. नामाची अनेक वचने होताना नामाना काही प्रत्यय लागतात. काही अनेकरूपी वचने एक वचनासारखीच राहतात.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**पुल्लिंग नामाची अनेक वचनी रूपे -**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कुत्रा | - | कुत्री | देव | - | देव |
| ससा | - | ससे | उंदीर | - | उंदीर |
| आंबा | - | आंबे | कवी | - | कवी |
| रस्ता | - | रस्ते | शत्रू | - | शत्रू |
| घोडा | - | घोडे | लाडू | - | लाडू |
| लांडगा | - | लांडगे | तेली | - | तेली |
| मासा | - | मासे | गहू | - | गहू |
| | | | फोटो | - | फोटो |

**स्त्रिलिंगी नामाची अनेक वचनी रूपे -**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वेळ | - | वेळा | तारीख | - | तारखा |
| वीट | - | विटा | विहीर | - | विहिरी |
| चूक | - | चुका | म्हैस | - | म्हैशी |
| केळ | - | केळी | सून | - | सूना |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| भिंत | - | भिंती | सोय | - | सोयी (सोई) |
| गाय | - | गायी (गाई) | | | |
| भाषा | - | भाषा | आज्ञा | - | आज्ञा |
| दिशा | - | दिशा | सभा | - | सभा |
| पूजा | - | पूजा | विद्या | - | विद्या |
| दासी | - | दासी | नदी | - | नद्या |
| दृष्टी | - | दृष्टी | काठी | - | काठ्या |
| बी | - | बिया | भाकरी | - | भाकऱ्या / भाकरी |
| स्त्री | - | स्त्रिया | लेखणी | - | लेखण्या |
| सासू | - | सासवा | पिसू | - | पिसवा |
| जाऊ | - | जावा | | | |

**नपुसकलिंगी नामाची अनेक वचनी रूपे -**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| घर | - | घरे | फूल | - | फूले |
| दार | - | दारे | शेत | - | शेते |
| पाखरू | - | पाखरे | घड्याळ | - | घड्याळे |
| झाड | - | झाडे | मोती | - | मोते (मोत्ये) |
| | | | मिरी | - | मिरे (मिऱ्ये) |

**अपवाद**

पाणी, लोणी, दही, अस्थी, गुळवणी.

❋❖❋❖❋❖❋❖❋

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# काळ

वाक्यात दिलेल्या क्रियापदावरून जसा क्रियेचा बोध होतो, तसाच ती क्रिया कोणत्या वेळी झाली आहे याचा बोध होतो. त्यास 'काळ' असे म्हणतात.

मुख्य काळ तीन आहेत.

1) वर्तमान काळ 2) भूतकाळ 3) भविष्यकाळ

**1) वर्तमान काळ** - क्रियापदाच्या रुपावरून क्रिया 'आता' घडते आहे असे जेंव्हा समजते तेव्हा तो वर्तमान काळ असतो
उदा. मी अभ्यास करतो.

**2) भूतकाळ** - क्रिया 'पूर्वी' घडली आहे असे जेव्हा कळते तेव्हा तो भूतकाळ होतो.
उदा. मी अभ्यास केला.

**3) भविष्यकाळ** - क्रिया 'पुढे' घडेल असे जेव्हा कळते तेव्हा तो भविष्यकाळ होतो.
उदा. मी अभ्यास करेन.

काळाचे पुढील चार पोट प्रकार बनतात.

1) साधा 2) अपूर्ण 3) पूर्ण 4) रीती

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| **प्रकार** | **वर्तमान काळ** |
|---|---|
| साधा | मी निबंध लिहितो. |
| अपूर्ण | मी निबंध लिहीत आहे. |
| पूर्ण | मी निबंध लिहिला आहे. |
| रीती | मी निबंध लिहीत असतो. |
| **प्रकार** | **भूतकाळ** |
| साधा | मी निबंध लिहिला. |
| अपूर्ण | मी निबंध लिहित होतो. |
| पूर्ण | मी निबंध लिहिला होता. |
| रीती | मी निबंध लिहीत असे. |
| **प्रकार** | **भविष्यकाळ** |
| साधा | मी निबंध लिहीन. |
| अपूर्ण | मी निबंध लिहीत असेन |
| पूर्ण | मी निबंध लिहिला असेन |
| रीती | मी निबंध लिहीत जाईन. |

# विरुद्धार्थी शब्द

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अकारण | × | सकारण | जयजयकार | × | धि:कार | सेवक | × | मालक |
| अत्यावश्यक | × | अनावश्यक | सत्कर्म | × | दुष्कर्म | साक्षर | × | निरक्षर |
| अनुरूप | × | विरुप | सदय | × | निर्दय | नीट | × | अव्यवस्थित |
| आकलनीय | × | अनाकलनीय | दोष | × | गुण | पुढे | × | मागे |
| आसक्ती | × | अनासक्ती / विरक्ती | पूर्ण | × | अपूर्ण | नम्र | × | उद्धट |
| | | | स्तुती | × | निंदा | जबाबदार | | बेजबाबदार |
| रागीट | × | प्रेमळ | सुयोग | × | कुयोग | सुशोभित | | विशोभित |
| मान | × | अपमान | संपूर्ण | × | अपूर्ण | स्पृश्य | | अस्पृश्य |
| औरस | × | अनौरस | क्षय | × | अक्षय | हिशेबी | | बेहिशेबी |
| वृद्ध | × | तरुण | सोय | × | गैरसोय | ज्ञानी | | अज्ञानी |
| सत्पात्र | × | अपात्र | सूर्योदय | × | सुर्यास्त | नीती | | अनीती |

# समानार्थी शब्द

अर्थ - पैसा

देऊळ - मंदिर, राऊळ, देवालय

घर - निवास, सदन, ग्रह, धाम

नृप - राजा, भूपती, भूपाल, नृपती

पाऊस - पर्जन्य, वर्षा, जलधारा

उपवन - बगीचा, बाग, उद्यान

आज्ञा - हुकूम, आदेश

उन्माद - कैफ, झिंग, धुंदी

पिता - वडील, जनक, बा, पिताश्री, जन्मदाता

पारितोषिक - बक्षीस, पुरस्कार, इनाम

पुत्र - सुत, तनय, नंदन, दुहित

पुत्री - कन्या, सुता, दुहिता, तनुजा, लेक

पोपट - राघू, शुक, कीर, रावा

पृथ्वी - ईला, वसुंधरा, क्षमा, धरती, धरित्री, वसुधा.

किरण - कर, अंशु, रश्मी.

गरूड - खगेंद्र, वैनतेय, द्विजराज

राक्षस - असुर, दानव

रम्य - चारू, छान, सुंदर

रिवाज - पद्धत, चाल, रूढी

चांदणे - कौमुदी, ज्योत्स्ना, चंद्रिकारश्मी

वस्त्र - वसन, अंबर, कपडा

झरा - निर्झर, प्रवाह, ओहळ, ओढा

विस्मय - नवल, आश्चर्य, अचंबा

शत्रू - अरी, रिपू, वैरी

वंदन - दंडवत, नमन, नमस्कार, प्रणाम

चंद्र - शशी, चांदोबा, रजनीनाथ, इंदू, शशांक, सोम, विधू, सुधांशू, सुधाकर

छंद - नाद, लहर

सिंह - वनराज, शाईल, केसरी, मृगेंद्र

स्नेह - मैत्र, मित्रता, मित्रत्व

संहार - नाश, विनाश, विध्वंस, नंगानाच

थंड - शीतल, गार

दुर्दैवी - अभागी, दैवहीन, भाग्यहीन

हात - हस्त, कर, भुजा, बाहू, पाणि

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# अनेक शब्दांबद्दल एक शब्द

रणांगणावर लढताना आलेले मरण ..................................वीरमरण
कर्तव्य पार पाडण्यात नेहमी जागरूक राहणारा.......................कर्तव्यदक्ष
कविता करणारी.....................................................कवयित्री
किल्ल्याच्या सभोवतीची भिंत ......................................तट
केलेले उपकार जाणणारा .........................................कृतज्ञ
खूप मोठा विस्तार असलेला.......................................विस्तिर्ण
स्वतःबद्दल अभिमान असणारा .....................................स्वाभिमानी
स्वर्गातील इंद्राची सुंदर बाग .......................................नंदनवन
जमीन व पाणी अशा दोन्ही ठिकाणी राहणारे ........................उभयचर
ज्याला कोणीही शत्रू नाही असा ...................................अजात शत्रू
थोड्यावर संतुष्ट असणारा.........................................अल्पसंतुष्ट
दररोज ठरलेला कार्यक्रम..........................................दिनक्रम, दिनचर्या
दुसऱ्यावर अवलंबून असलेला.......................................परावलंबी
देवापुढे सतत जळणारा दिवा .......................................नंदादीप
देवळातील मूर्तीजवळचा आतील भाग..............................गाभारा, गर्भगृह
स्वतःचा फायदा न पाहणारा.......................................निःस्वार्थी
स्वतःची वस्तू कोणालाही सहज देणारा .............................उदार, दिलदार
हत्तीला काबूत ठेवणारा.............................................माहूत
हरणासारखे डोळे असणारी.........................................हरणाक्षी, मृगाक्षी, मृगनयना
हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत ..................................आसेतुहिमाचल
पायापासून डोक्यापर्यंत ..........................................आपादमस्तक
पाहण्यासाठी आलेले लोक.........................................प्रेक्षक
पहाटे पूर्वीची वेळ...................................................उषःकाल
प्राण्यांच्या पाठीवर घालायचे नक्षीदार कापड .........................झुल
क्षणकाल टिकणारे...................................................क्षणभंगूर
बोलायला व ऐकायला न येणारा.....................................मूक-बधीर
फुकट जेवण मिळण्याचे ठिकाण.....................................अन्नछत्र
भाषण करणारा.......................................................वक्ता
भाषण ऐकणारा ......................................................श्रोता
पूर्वी कधीही घडले नाही असे.......................................अभुतपूर्व, अपूर्व
नाव चालविणारा .....................................................नावाडी, नाखवा
नदीतील पाण्याचा उंचावरून पडणारा प्रवाह ..........................धबधबा, प्रपात
ज्याचा तळ (थांग) लागत नाही असा................................अथांग
उपयुक्त मनोरंजक लिहणारा .......................................साहित्यिक
राजाने मान्यता दिलेला..............................................राजमान्य
माशासारखे डोळे असणारी.........................................मीनाक्षी

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# संधी

आपण बोलताना अनेक शब्द एका पुढे एक असे उच्चारतो. त्यावेळी एकमेकाशेजारी येणारे दोन वर्ण एकमेकात मिसळतात व त्यांचा जोडशब्द तयार होतो. त्यास संधी असे म्हणतात.

उदा. 'सूर्य उदय झाला' असे न म्हणता 'सूर्योदय झाला' असे म्हणतो. वाक्मय असे न म्हणता वाङ्मय म्हणतो. अशा प्रकारचे जोड शब्द तयार करताना पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण हे एकमेकात मिसळतात व त्या दोहोबद्दल एक वर्ण तयार होतो. वर्णाच्या अशा एकत्र येण्यास संधी असे म्हणतात. संधी म्हणजे सांधणे किंवा जोडणे होय.

संधीचे तीन प्रकार आहेत.

संधी

1) स्वरसंधी    2) व्यंजन संधी    3) विसर्ग संधी

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

स्वर संधी - संधी होताना जवळ येणारे वर्ण स्वर असतील तर त्यास स्वरसंधी म्हणतात.

* **नियम 1** - ऱ्हस्व किंवा दीर्घ स्वरापुढे तोच स्वर ऱ्हस्व किंवा दीर्घ आल्यास त्या दोहोबद्दल त्याच जातीचा दीर्घ स्वर येतो.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उदा. : | सूर्य+अस्त | = | अ+अ | = | आ | = | सूर्यास्त |
| | विद्या+अर्थी | = | आ+अ | = | आ | = | विद्यार्थी |
| | मुनि+इच्छा | = | इ+इ | = | ई | = | मुनीच्छा |
| | मही+ईश | = | ई+ई | = | ई | = | महीश |
| | गुरु+उपदेश | = | उ+उ | = | ऊ | = | गुरुपदेश |

* **नियम 2** - अ किंवा आ या स्वरापुढे इ किंवा ई आल्यास त्या दोहो ऐवजी 'ए' येतो उ किंवा ऊ आल्यास त्याऐवजी ओ येतो व ऋ आल्यास त्या ऐवजी 'अर' येतो व संधी होते.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उदा. : | ईश्वर+इच्छा | = | अ+इ | = | ए | = | ईश्वरेच्छा |
| | उमा+ईश | = | आ+ई | = | ए | = | उमेश |
| | चंद्र+उदय | = | अ+उ | = | ओ | = | चंद्रोदय |
| | महा+उत्सव | = | आ+उ | = | ओ | = | महोत्सव |
| | देव+ऋषी | = | अ+ऋ | = | अर् | = | देवर्षी |
| | महा+ऋषी | = | आ+ऋ | = | अर् | = | महर्षी |

* **नियम 3 -** अ किंवा आ यांच्यापुढे ए किंवा ऐ हे स्वर आल्यास त्या दोहोबद्दल ऐ येतो, ओ किंवा औ आल्यास त्याबद्दल औ येऊन संधी होतो.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उदा. : | एक+एक | = | अ+ए | = | ऐ | = | एकैक |
| | मत+ऐक्य | = | अ+ऐ | = | ऐ | = | मतैक्य |
| | सदा+एव | = | आ+ए | = | ऐ | = | सदैव |
| | जल+ओघ | = | अ+ओ | = | औ | = | जलौघ |
| | गंगा+ओघ | = | आ+ओ | = | औ | = | गंगौघ |
| | वृक्ष+औदार्य | = | अ+औ | = | औ | = | वृक्षौदार्य |

* **नियम 4 -** इ उ ऋ यांच्यापुढे विजातीय स्वर आल्यास 'इ ई' बद्दल 'य'; उ ऊ बद्दल 'व' आणि ऋ बद्दल 'र' हे वर्ण येतात व संधी होतो.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उदा. | प्रीति+अर्थ | = | इ+अ=य+अ=य | = | प्रीत्यर्थ |
| | इति+आदी | = | इ+आ=य+आ=या | = | इत्यादी |
| | अति+उत्तम | = | इ+उ=य+उ=यु | = | अत्युत्तम |
| | प्रति+एक | = | इ+ए=य+ए=ये | = | प्रत्येक |
| | मनु+अंतर | = | उ+अ=व+अ=व | = | मन्वंतर |
| | पितृ+आज्ञा | = | ऋ+आ=र+आ=रा | = | पित्राज्ञा |

* **नियम 5 -** ए ऐ ओ औ या स्वरांपुढे कोणताही स्वर आल्यास त्या बद्दल 'अय्, आय्, अव, आव असा आदेश होऊन संधी होतो.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उदा. | ने+अन | = | ए+अ=अय+अ=अय | = | नयन |
| | गै+अन | = | ऐ+अ=आय्+आ=आय | = | गायन |
| | गौ+ईश्वर | = | ओ+ई=अव्+ई=अवी | = | गवीश्वर |
| | नौ+इक | = | औ+इ=आव्+इ=आवि | = | नाविक |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# व्यंजन संधी

संधी होताना जवळ येणारा पहिला वर्ण व्यंजन व दुसरा वर्ण स्वर किंवा व्यंजन असेल तर त्यास व्यंजनसंधी म्हणतात.

* **नियम 1 -** पहिल्या पाच वर्गापैकी (क पासून प पर्यंत) कोणत्याही व्यंजनापुढे कठोर व्यंजन आले असता त्या पहिल्या व्यंजनाच्या जागी त्याच वर्गातील व्यंजन येऊन संधी होतो.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उदा. : | वाग्+पति | = | ग्+प् | = | क्+प = क्प | = | वाक्पती |
| | विपद्+काल | = | द्+क् | = | त्+क = त्क | = | विपत्काल |
| | षड्+शास्त्र | = | ड+श | = | ट+श = टश | = | षट्शास्त्र |
| | क्षुध+पिपासा | = | ध+प | = | त+प = त्प | = | क्षुत्पिपासा |

* **नियम 2 -** पहिल्या पाच वर्गा पैकी अनुनासिकाशिवाय कोणत्याही व्यंजनापुढे स्वर किंवा मृदू व्यंजन आल्यास त्याच्या जागी त्याच वर्गातील तिसरे व्यंजन येऊन संधी होतो.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उदा. : | वाक्+विहार | = | क्+व् | = | ग्+व = ...... | = | वाग्विहार |
| | सत्+आचार | = | त्+आ | = | द्+आ = दा | = | सदाचार |
| | षट्+रिपू | = | ट्+र | = | ड+र = ड्र | = | षड्रिपू |
| | अच्+आदी | = | च+आ | = | ज+आ =जा | = | आजादी |
| | अप्+ज | = | प्+ज | = | ब+ज = ब्ज | = | अब्ज |

* **नियम 3 -** पहिल्या पाचवर्गापैकी कोणत्याही व्यंजनापुढे अनुनासिक आल्यास पहिल्या व्यंजनाबद्दल त्याच वर्गातील अनुनासिक येऊन व्यंजन संधी होतो.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उदा. : | वाक्+निश्चय | = | क्+न् | = | ङ+न | = | वाङ्निश्चय |
| | षट्+मास | = | ट्+म् | = | ण+म | = | षण्मास |
| | सत्+मती | = | त+म् | = | न+म | = | सन्मती |

* **नियम 4 -** त् या व्यंजनापुढे च् छ् आल्यास त् चा च् होतो.
त् या व्यंजनापुढे ज् झ् आल्यास त् चा ज् होतो.
त या व्यंजनापुढे ट् ठ् आल्यास त् चा ट् होतो.
त या व्यंजनापुढे ल् आल्यास त् चा ल् होतो.
त या व्यंजनापुढे श आल्यास त् चा च होतो. 'श' चा 'छ' होतो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उदा. : | सत्+चरित्र | = | त्+च् | = | च्+च | = | सच्चरित्र |
| | सत्+जन | = | त्+ज् | = | ज्+ज् | = | सज्जन |
| | तत्+टीका | = | त्+ट् | = | ट्+ट् | = | तट्टीका |
| | उत्+लंघन | = | त्+ल् | = | ल्+ल् | = | उल्लंघन |
| | सत्+शिष्य | = | त्+श् | = | च्+छ् | = | सच्छिष्य |
| | सत्+छेद | = | त्+छ् | = | च्+छ | = | उच्छेद |

# विसर्ग संधी

संधी होताना जवळ येणारा पहिला वर्ण विसर्ग व दुसरा वर्ण स्वर किंवा व्यंजन असेल तर त्यास विसर्ग संधी म्हणतात.

* **नियम 1** - विसर्गाच्या मागे अ हा स्वर असून पुढे मृदू व्यंजन आल्यास विसर्गाचा 'उ' होतो आणि तो मागील अ मध्ये मिसळून त्याचा ओ होतो.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उदा. : | यशः+धन | = यश+उ+धन | = | यशोधन |
| | मनः+रथ | = मन+उ+रथ | = | मनोरथ |
| | अधः+वदन | = अध+उ+वदन | = | अधोवदन |
| | तेजः+निधी | = तेज+उ+निधी | = | तेजोनिधी |

* **नियम 2** - विसर्गाच्या मागे अ आ खेरीज कोणताही स्वर येऊन पुढे मृदू व्यंजन आल्यास विसर्गाचा ए होतो व संधी होतो.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| उदा. : | निः+अंतर | = नि+र्+अं | = | निरंतर |
| | दुः+जन | = दु+र्+अ | = | दुर्जन |
| | बहिः+रंग | = बहि+र+अंग | = | बहिरंग |

* **नियम 3** - पदाच्या शेवटी र् येऊन त्यापुढे कठोर व्यंजन आल्यास र चा विसर्ग होतो.

उदा. : अंतर+करण = अंतःकरण चतुर+सूत्री = चतुःसूत्री

* **नियम 4** - पदाच्या शेवटी स अक्षर येऊन त्यापुढे कोणतेही व्यंजन आल्यास 'स' चा विसर्ग होतो.

उदा. : मनस+पटल = मनःपटल तेजस+कण = तेजःकण

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

* **नियम 5 -** विसर्गाच्या मागे अ हा स्वर असून पुढे क् ख् प् या पैकी एखादे व्यंजन आले तर विसर्ग कायम राहतो मात्र पुढे अन्य स्वर आला तर विसर्ग लोप पावतो.

उदा. : प्रातः+काल = प्रातःकाल तेजः+पुंज = तेजःपुंज अतः+एव = अतएव

* **नियम 6 -** विसर्गाच्या मागे इ किंवा उ असून पुढे क् ख् प् फ यापैकी कोणतेही व्यंजन आल्यास विसर्गाचा 'ष' होतो.

उदा. : निः+कर्ष = निष्कर्ष दुः+कीर्ती = दुष्कीर्ती

चतुःकोन = चतुष्कोन आयुः+क्रम = आयुष्क्रम

बहिः+कृत = बहिष्कृत

* **नियम 7 -** विसर्गाच्या पुढे श् स् आल्यास विसर्ग कायम राहतो किंवा लोप पावतो.

उदा. : चतुः+शृंगी = चतुःशृंगी पुरः+सर = पुरःसर

प्रातः+स्मरण = प्रातःस्मरण अंतःस्थ = अंतस्थ

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# अलंकार

'अलंकार' या शब्दाचा अर्थ दागिना. दागिने घातले की मनुष्याच्या शरीराला शोभा येते. तसेच नेहमीपेक्षा वेगळे व अर्थपूर्ण शब्द वापरले की भाषेचेही सौंदर्य खुलते.

कविप्रतिभा निर्मित, मनाला आनंद देणाऱ्या, चमत्कृतीयुक्त, भाषेला शोभा देणाऱ्या शब्द रचनेला भाषेचे अलंकार म्हणतात.

काही वेळेला शब्दातील अक्षर रचनेमुळे भाषेला शोभा येते तर केव्हा योजलेल्या शब्दामुळे अर्थाचे सौंदर्य खुलून दिसते यावरून भाषेच्या अलंकाराचे दोन प्रकार पडतात.

अलंकार

- 1) शब्दालंकार
  - यमक
  - अनुप्रास
  - श्लेष
- 2) अर्थालंकार
  - उपमा
  - उत्प्रेक्षा
  - रूपक
  - अपन्हुति
  - व्यतिरेक
  - अनन्वय
  - दृष्टांत इ.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

आपल्याला आठवीच्या अभ्यासक्रमात यमक, अनुप्रास, श्लेष या शब्दालंकाराचा व उपमा उत्प्रेक्षा व रूपक या अलंकाराचा अभ्यास करावयाचा आहे.

**I. शब्दालंकार** - शब्दातील अक्षर रचनेमुळे म्हणजेच शब्दाच्या चमत्कृतीमुळे भाषेला शोभा आणणाऱ्या अलंकाराला 'शब्दालंकार' म्हणतात.

**1) यमक** - हा अलंकार फक्त पद्यातच आढळतो. पद्याच्या एका चरणाच्या शेवटचे अक्षर किंवा कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठराविक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे आल्यास 'यमक' अलंकार होतो.

उदा. 1) नाचू किर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।

2) सुसंगती सदा घडो । सुजन वाक्य कानी पडो ।
कलंक मतीचा झडो, विषय सर्वथा नावडो।।

**2) अनुप्रास** - एखाद्या वाक्यातील किंवा कवितेच्या चरणातील ठराविक वर्णाची, अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे सौंदर्य निर्माण होते तेव्हा 'अनुप्रास' हा अलंकार होतो.

उदा. 1) हटातटाने पटा रंगवूनि जटा धरिशी का शिरी? मठाची उठाठेव का करी।

2) देवी दयावति दवडिसी दासाची दुःख दुर्दशा दूर ।

3) पापाते पळवितसे परम पवित्रे तुझ्या पयःपूर।

4) गाडी गुडगुडी आणि हातात सत्तेची छडी यांच्यात ते रमले होते.

**3) श्लेष -** एकच शब्द वाक्यात दोन अर्थांनी वापरल्यामुळे जी शब्द चमत्कृति निर्माण होते तेव्हा 'श्लेष' हा अलंकार होतो.

उदा. 1) शंकरास पुजिले सुमनाने
सुमन - मुलीचे नाव, सुमन - फूल, सु-मन - चांगले मन.

2) ही गाडी जावयाची आहे.
जावयाची - जाण्याची, जावयाची - मुलीच्या नवऱ्याची.

3) श्रीकृष्ण नवरा मी नवरी । शिशुपाल नवरा मी न-वरी
नवरी - वधू, न-वरी - वरणार नाही.

4) घरात मला तोंड उघडण्याचा प्रसंग फक्त जेवतानाच काय तो येतो.
तोंड उघडणे - घास घेणे, तोंड उघडणे - बोलणे.

**II. अर्थालंकार** - वाक्यात, काव्यपंक्तीत योजलेल्या अर्थामुळे प्राप्त होणाऱ्या सौंदर्याला 'अर्थालंकार' असे म्हणतात. यामध्ये दोन भिन्न वस्तूतील साम्य किंवा विरोध दर्शविलेला असतो.

उपमा अलंकार शिकण्यापूर्वी चार भिन्न घटकांचा परिचय करून घेऊया.

1) उपमेय - ज्याची तुलना करायची ते.
2) उपमान - ज्याच्याशी तुलना करायची ते
3) साधर्म्य - दोन वस्तूतील असलेला सारखेपणा.
4) साम्य दाखविणारे शब्द - सारखा, जसा, जेवी, सम, परी, गत इ.

उदा. : वैजनाथचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आहे.
अक्षर-उपमेय, मोती-उपमान, सुंदर-दोन्हीतील सारखेपणा
सारखे - साम्य दाखविणारा शब्द.

**1) उपमा (व्याख्या) -** वस्तूतील साम्य चमत्कृतिपूर्ण रीतीने जेथे वर्णन केलेले असते तेथे 'उपमा' अलंकार होतो. किंवा दोन वस्तूंची जिथे तुलना केली जाते तेथे 'उपमा' अलंकार होतो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

✻ जेव्हा वाक्यात, पद्यपंक्तीत जसे, तसे, सम, सारखे, परि, गत इ. साम्य दर्शक शब्द येतात तेव्हा 'उपमा' अलंकार होतो.

उदा. 1) असेल तेथे वहात सुंदर शुभ्र-दुग्ध सम नदी।
असतिल डोलत निळी तांबडी कमळे पाण्यामधी ।
घरे तेथली सुरेख असतिल चमकत सोन्यापरी ।
आत लाविल्या असतिल रंगीबेरंगी तसबिरी ।।

2) आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे।

3) शिवाजी सिंहासारखा शूर होता.

**2) उत्प्रेक्षा** - उपमेय हे जणू 'उपमानच' आहे असे जेथे वर्णन केलेले असते तेथे 'उत्प्रेक्षा' हा अलंकार होतो.

✻ जेव्हा वाक्यात, पद्य पंक्तीत जणू, जणू काही, जणू काय, की, गमे, भासे, वाटे यापैकी साधर्म्य सूचक शब्द येतो तेव्हा 'उत्प्रेक्षा' हा अलंकार होतो.

उदा. 1) किती माझा कोंबडा मजेदार। मान त्याची कितितरी बाकदार।
शिरोभागी तांबडा तुरा हाले । जणू जास्वंदी फूल उमलेले।
अर्धपायी पांढरीशी विजार । गमे विहंगातील बडा फौजदार ।

2) ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वाचे प्रेम जणू

3) शिवाजी जणू सिंहच होता.

**3) रूपक** - उपमेय व उपमान ही भिन्न नसून एकरूप आहेत. असे वर्णन जेथे केलेले असते तेथे 'रूपक' अलंकार होतो.

उदा. 1) पहा पाखरे चरोनि होती झाडावर गोळा ।
कुठे बुडाला पलीकडिल तो सोन्याचा गोळा ।। (सूर्य)

2) काय बाई सांगो । स्वामीची ती दृष्टी।
अमृताची वृष्टी । मज होय ।।

3) शिवाजी सिंहच होता.

✻✻✻✻✻✻✻✻✻

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS